

पंजाबची पंढरी

जि. स. बागलकोटे

पंजाबची पंढरी

☆

: लेखक :

जि. स. बागलकोटे

☆

किंमत ४ रुपये

मुद्रक :
जि. स. बागलकोटे
डेक्कन प्रेस, मिरज.

• •

छायाचित्रे :
लक्ष्मणराव यंकंजी
पंढरपूर

• •

आषाढ शुद्ध ११ शके १८९४

• •

प्रकाशिका :
सौ. चिमाबाई जि. बागलकोटे
मिरज



‘ पंजाबची पंढरी ’ पुस्तकाने
प्रवास–वर्णनात
एक नवा पायंडा घातला

• •


पंजाबमध्ये ‘ घुमान ’ येथील संत नामदेव यांच्या समाधीच्या दर्शनासाठीं पंढरपूराहून श्री. ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांचे नेतृत्वाखाली वारकऱ्यांची दिंडी गेली. तीबरोबर श्री बागलकोटे होते. उत्तर हिंदुस्थानातील प्रवासात इतर अनेक तीर्थक्षेत्रांचे दर्शनपण त्यांनी दिंडीबरोबर घेतले. या साऱ्यांचे वर्णन पुस्तकात आहे. त्यात एक तऱ्हेचा निराळा विषय आणि वेगळा मार्ग असल्यानें प्रवास–वर्णनात या पुस्तकाने नवा पायंडा घालून दिला आहे असे मला वाटते.

डॉ. ना. भि. परुळेकर
संपादक ‘ सकाळ ’ पुणे

कृतज्ञता

'पंजाबची पंढरी' या ग्रंथाचे

मूळ प्रेरक व सहाय्यक



श्री. रत्नाप्पाण्णा कुंभार

चेअरमन्

श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.

गंगानगर–इचलकरंजी

卐

नामदेवाची पायरी

संतशिरोमणी नामदेवमहाराज यांच्या पंजाबमधील घुमानक्षेत्रात जाऊन तेथे नामदेवमहाराजांची सातशेवी जयंती साजरी केली. त्यासाठी अडीचशे वारकऱ्यांची दिंडी उत्तर भारतात तीर्थाटन करून आली. त्या यात्रेची ही माहिती 'सकाळ' दैनिकातून सात लेखात प्रसिद्ध झाली. ते लेख या पुस्तकांच्या रूपाने वाचकांचे हाती देत आहे.

ही लेखमाला ' सकाळ ' मधून येत होती, तेव्हा शेकडो लोकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. समाजावर चांगले संस्कार होण्याला उपयुक्त असे हे लेख पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावेत, असे पंचगंगा साखर कारखान्याचे चेअरमन् श्रीं. रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी सुचविले आणि त्यांच्या मदतीतूनच हे पुस्तक प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे.

पंजाबच्या या नामदेवयात्रेची मूळ कल्पना श्री ज्ञानेश्वरमाऊली देहूकर यांची. त्यांच्यामुळे यात्रेचा हा योग आला आणि यात्रा संपल्यावर ही माहिती ' सकाळ ' मध्ये प्रसिद्ध करून डॉ. नानासाहेब परूळेकर यांनीं या लेखमालेला मोठे महत्त्व दिले. या यात्रेची माहिती मी तयार केली. पण लेखांची मांडणी, त्यांना ठाकठीक स्वरूप देऊन सुटसुटीत व आकर्षक करण्यासाठी नानासाहेब यांनीं खूप त्रास घेतला. त्यांच्या या योजकतेमुळेच हे लेख परिणामकारक होऊ शकले.

या पुस्तकातून आमच्या तीर्थाटनाचीं माहिती आली. पण प्रामुख्याने पंजाब येथील नामदेवरायाच्या पायापाशी जाण्याचा योग हा

या यात्रेचा मुख्य भाग. नामदेवराय अमृतसरजवळ घुमान येथे आठरा वर्षे राहिले. तेथे त्यांचे मोठे मंदिर आहे. नामदेवरायांची तपाची जागा तेथे आहे. नामदेवरायांच्या नावाने एक हायस्कूलही तेथे चाललेले आहे. सारे घुमान गाव व त्याचा परिसर नामदेवरायाच्या भक्तीने भारलेला आहे. पंढरपुरच्या पांडुरंगाचा हा लाडका भक्त नामदेव पंजाबात गेला व त्याने एकप्रकारची पंढरीच उभी केली. हे चित्र पुढे उभे राहिल्याने या पुस्तकाला 'पंजाबची पंढरी' असे नाव दिले आहे.

या पुस्तकाची छपाई, मांडणी वगैरे सर्व काम माझा मुलगा सुरेश व सून सौ. सुनीता या दोघांनी केले. एक प्रकारे कौटुंबिक श्रमातून तयार झालेले हे पुस्तक आहे.

दिंडीतून आलेल्या वारकऱ्यांच्या सहवासात अभंगवाणी सतत कानावर येई. त्या भक्तिभावाच्या वातावरणातून एक महिना जाताना जे सात्विकतेचे, सत्प्रवृत्तीचे, सद्‌भावाचे वातावरण सर्वत्र पसरलेले होते. या सात्विकतेच्या, समाधानाच्या संस्कारक्षम अशा यात्रेच्या अनुभवातून आम्ही परतलो व पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनानंतर यात्रा संपवली. त्या यात्रेची ही माहिती 'पंजाबची पंढरी' या नावाने प्रसिद्ध होत आहे.

पंढरपुरला विठ्ठलमंदिरात जाताना सुरुवातीला नामदेवाची पायरी लागते. 'पंजाबची पंढरी' या पुस्तकाच्या प्रास्ताविकाला नामदेवाची पायरी नाव दिले ते यथार्थच वाटेल.

–जि. स. बागलकोटे



संत श्री नामदेव

तुकोबारायांचे वंशज देहूकर पितापुत्रांनी पंढरपूरहून दोनशे भाविकांची दिंडी पंजाबात नामदेवचरणी पोचवली

पंढरपूर येथे चंद्रभागेच्या वाळवंटात आरती करून दोनशेवीस स्त्री-पुरुष मोठ्या उत्साहाने निघाले आणि-

-नामसंकीर्तन यात्रा सुरू झाली. त्याची ही हकिगत या पहिल्या लेखात दिली आहे. प्रवास-वर्णनाबरोबर सामान्य जनतेचे हृदय भरलेले यात दिसेल आणि ते हृदय हिन्दच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एक आणि वरच्या पातळीतले आहे, याचा प्रत्यय येईल.

मराठ्यांच्या राजकीय इतिहासात पेशवा राघो भरारीने अटकेपार भगवा झेंडा पोहोचविला, त्या अगोदर पाचशे वर्षे श्री संत शिरोमणी नामदेवमहाराजांनी पंढरीचे भगवे निशाण पंजाबात नेऊन रोवले. पेशवे परत आले, पण नामदेवमहाराजांनी वयाच्या उत्तरार्धात अठरा वर्षे तिकडे घालविली. त्या भागांतील गुरुमुखी भाषेत भक्तिकाव्य निर्माण केले. शीख धर्माचा मुख्य ग्रंथ, ' ग्रंथसाहेब ' त्यात नामदेवमहाराजांची गीते गोवली आहेत. गुरुनानक यांनी त्यांचा गुरु अर्थाने गौरव केला.




पंढरपुराहून निघून देहू, आळंदी, नाशिकवरून गुजरातमार्गे पंजाबमधील घुमान येथे वारकऱ्यांची दिंडी गेली व परत बिहार ओरिसामार्गे परत आली. पाच हजार मैलांच्या प्रवासमार्गाची कल्पना या नकाशावरून येईल.

नामदेवांची झेप :

संत नामदेवांनी त्या भागातील गुरुमुखी भाषेत भक्तिकाव्य निर्माण केले, कीर्तनामधून सारा पंजाब भक्तिमार्गाकडे ओढून घेतला, अमृतसरपासून पस्तीस मैलावर घुमान या गावी त्यांनी वास्तव्य केले, तेथे परमार्थाचा दीप उजळला. पंजाब राज्यातील गुरुदासपूर जिल्हयातील बटाला

तालुक्यातील घुमान छोटे गाव, तेथे त्यांचे सुरेख मंदिर आहे. नामदेवमहाराजांची ७०० वी जयंती महाराष्ट्रात साजरी होत असता घुमानला जाऊन तेथेही ती करण्याची महत्वाकांक्षा धरून आमची ही दिंडी तिकडे चालली होती.


देहूकरांच्या मनाचा संकल्प:



कल्पना श्री. ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांची. पंढरपूरला वारकऱ्यांचे जे फड आहेत, त्यात देहूकरांच्या फडाचे प्रमुख श्री. सोपानकाका देहूकर. त्यांचे चिरंजीव श्री. ज्ञानेश्वर माऊली. तुकोबारायांची ही अकरावी पिढी. पंजाबात जाऊन नामदेव जयंतीचा सोहळा साजरा करताना जाता येताची तीर्थेही करावीत, म्हणजे भजन करीत जाणारी ही दिंडी एकप्रकारे नाम–संकीर्तन यात्राच होती. दोनशेवीस वारकरी चार मोटारीत घेऊन चैत्र एकादशीला यात्रा सुरू झाली. दिंडीतून जाण्याची संधी या वेळी ज्ञानेश्वर माऊली देहूकर महाराज यांच्या कृपेनें साधता आली, दिंडीसमवेत मी सपत्निक निघालो.

वाळवंटात आरती केली:

बसेस इंदूरहून आणविल्या होत्या. हरिभाऊ शिंगटे मर्ढेकर हे यात्राप्रमुख होते. अडीचशे–तीनशे वारकऱ्यांनी दिंडीत सामील होण्याची आपली इच्छा प्रगट केली होती. पण पहिल्या दोनशेवीस जणांना प्रवेश दिला आणि बाकीच्यांना नाराज करावे लागले. येणाऱ्या २२० वारकऱ्यात शंभर महिला होत्या. महाराष्ट्राच्या दहा जिल्ह्यांतून निघालेल्या दिंडीने पंढरपूरला चंद्रभागेच्या वाळवंटांत आरती केली. शिंगाड्याने शिंग फुंकले आणि मोटारीतून आम्ही निघालो.



शिंगाडयाने शिंग फुंकले आणि दिंडीच्या प्रवासास सुरुवात झाली.

उघड्यावर चुली पेटलेल्या:



दिंडीबरोबर सुमारे शंभर स्त्रिया होत्या. जागा मिळेल तेथे त्या स्वयंपाकाची सोय लावून घेत. त्यातहि असलेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो आहे.

जेवणखाण्याची आपआपली सोय स्वतंत्रपणाने करावयाची, अशी सूचना आधी देऊन ठेवली होती. त्यामुळे मुक्कामाच्या ठिकाणी साठसत्तर स्टोव्ह, पंचवीसतीस चुली पेटलेल्या दिसत. एका गावचे चार वारकरी ते आपला वेगळा स्वयंपाक करीत. दुसऱ्या गावच्या तीन बायका आपल्या पुरते जेवण तयार करीत. नवराबायको आणि कोणी नात्यातील बाई यांचा एकत्र स्वयंपाक होई. त्यासाठी सर्वांनी बरोबर शिधासामुग्री आणली

होती. शक्यतो नदीकाठी, किंवा विहीर, नळ, पाण्याचा पाट अशा ठिकाणी उघड्या जागेत मुक्काम करण्याची पूर्वयोजना होती. एकदम इतक्या मोठ्या समाजाला निवासासाठी जागा मिळणे अवघड होईल, संडास, स्नानाची सोयही अपुरी पडेल, म्हणून मोकळ्या जागेत मुक्काम करण्याचा रास्त मार्ग पत्करला होता. तथापि काहीं ठिकाणी धर्मशाळावजा इमारतीत देवालयात मुक्काम करण्याचा थोडा प्रसंगहि आला.

मंत्री पाटील यांच्या हस्ते महापूजाः

पंढरपूराहून पहिला मुक्काम देहू. (दीडशे मैलांवर) तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले तेथे इंद्रायणीत वारकऱ्यांनी स्नान केले. तुकोबारायांचे दर्शन घेतले व ज्ञानबा–तुकारामांच्या गजरात दिंडी देहूमधील विठोबाच्या देवळात आल्याबरोबर महाराष्ट्र राज्याचे राज्य मंत्री ना. शंकरराव पाटील यांच्या हस्ते महापूजा झाली. संतमंडळी देहूला आली म्हणून कुर्ला येथील बीडाचे कारखानदार श्री. साहेबराव शिंगटे (मर्ढेकर) यांनी सर्वांना जेवण घातले आणि तुकोबारायांच्या जयजयकारात आम्ही पुढे आळंदी गाठली.

दुपारची वेळ, आळंदीतील इंद्रायणी नदीचा घाट तापून गेला होता. तरीपण पादत्राणे काढून तापलेल्या फरशीवर अनवाणी उभे राहून घाटावरील पुंडलिकापुढे आरती म्हटली आणि ज्ञानेश्वर मंदिरात जाऊन माऊलींच्या समाधीचे मनसोक्त दर्शन घेतले. ज्ञानोबारायांचा आशीर्वाद घेऊन दिंडीच्या चारी मोटारी नाशिकमार्गे त्रिंबकेश्वरास निवृत्तीनाथांच्या मंदिरात आल्या. रात्री भजन, आरती करून त्रिंबक येथील त्रिंबकेश्वर या ज्योतीर्लिंगाचे दर्शन घेतले. भारतात बारा ज्योतिर्लिंगे असून त्यापैकी त्रिंबकेश्वर एक प्रमुख आहे. त्रिंबकेश्वराचे मंदिर पुरातन शिल्पशास्त्र

पद्धतीने बांधलेले, देवतांच्या अनेक मूर्ती त्यावर कोरलेल्या आहेत. देऊळ बांधकामाला सुरुवात १७५५ मध्ये झाली. बांधकाम ३१ वर्षांनी पुरे झाले.

पेशव्यांची धर्मबुद्धी:

त्या काळात श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनी १६ लाख रुपये मंदिराच्या बांधकामासाठी खर्च केले, अशी नोंद आहे. आज त्याची किंमत तीन कोटी होईल. चारी बाजूला उंच भिंती, त्यांच्या आत चोहोबाजूंनी विस्तीर्ण फरसबंद पटांगण, मध्यभागी आकर्षक चित्रे असलेली ही मंदिराची वास्तु, असे हे त्रिंबकेश्वरचे स्थान आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात थोड्या खोलीवर ज्योतिर्लिंग आहे. उत्सवाच्या वेळी श्री त्रिंबकराजाला रत्नजडित सुवर्ण मुकुट घालतात. प्राचीन काळी गोहत्येचे पातक गौतम ऋषींना लागलें असता शंकराच्या जटेतील गंगा आणून त्यात स्नान कराल तर, या पातकापासून मुक्त व्हाल, असे कोणी त्यांना सांगितले. तेव्हा त्यांनी तपश्चर्या केली, शंकराला प्रसन्न करून घेतले व गंगा आणली.

त्रिंबकेश्वरला गंगा आणली:

त्रिंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी पर्वतावर गंगा मिळविली, ते गोदावरीचे उगम स्थान येथे आहे. तेथून गुप्त झालेली ही गंगा जवळच कुशावर्त तीर्थात प्रगट झाली. गौतम ऋषींनी त्या तीर्थात स्नान केले व पापातून ते मुक्त झाले. अशा प्रकारे भूलोकावर आलेली गंगा (गोदावरीचे उगमस्थान) त्या संबंधित ज्योतिर्लिंग असे महत्व या क्षेत्राला आहे. कुशावर्त तीर्थ हा एक मोठा षटकोनी असा भक्कम बांधकाम केलेला दगडी हौद. श्रीमंत होळकर सरकार यांचे दिवाण

पावनेरकर यांनी ७ लाख रुपये खर्च करून हे तीर्थ बांघले. तीर्थाच्या भोवती ओवऱ्या आहेत आणि त्यात दगडावर कोरलेले अप्रतिम नक्षीकाम आहे.

त्रिंबकेश्वरहून नाशिक २० मैलावर. तेथे दुपारी येऊन गोदावरी स्नान आणि काळ्या रामाचे दर्शन असा कार्यक्रम ठरला होता. नाशिक गावात भद्राकाली मंदिर, बालाजी मंदिर, कपालेश्वर मंदिर अशी देवालये आहेत. गंगेच्या काठी मोठी घंटा देवालयाच्या बुरजावर आहे. ती वाजविताना तीनचार मैलापर्यंत आवाज ऐकू येतो असे सांगतात. हीच ती नारो शंकराची घंटा. तीर्थाटनाच्या कार्यक्रमातील महाराष्ट्राचे हे शेवटचे स्थान. तेथून आमची दिंडी गुजरातेत जाण्यासाठी निघाली.

○ ○ ○

: २ :

शिकलेल्यांनी डांगचा आनंद पाहावा व विचारावे आपल्या जीवनात कुठे चुकते का ?

राज्य पुनर्रचनेनंतर गुजरातेत गेलेल्या डांगमधील लोकनृत्य, सापुतारा या गुजरातच्या नव्या हिल स्टेशनची उभारणी कशी चालली आहे. ती या लेखात वाचा.

सापुताराचे हिलस्टेशन :

आमच्या दिंडीने महाराष्ट्राची हद्द ओलांडली व गुजरातेत प्रवेश केला. गुजरात राज्यात प्रवेश करतानाच सापुतारा हिलस्टेशन किंवा गिरीस्थान लागले. डांग जिल्ह्यातील हा प्रेक्षणीय उंचवटयाचा भाग. नव्या गुजरात राज्याची १९६० मध्ये स्थापना झाल्यावर या राज्यासाठीं एखादे 'हिल स्टेशन' असावे, म्हणून योजना आखण्यासाठी सरकारने एक कमिटी नेमली. कमिटीने नाशिकपासून ५० मैलांवर हिल स्टेशनसाठीं सापुताराची निवड केली. समुद्र सपाटीपासून ३२०० फूट उंचीवर सापुतारा, वर्षाला सामान्यत: १०० इंच पाऊस होतो. हिरव्यागार दाट झाडीने वेढलेला टापू. येण्या-जाण्याला चांगली सोय आहे. त्याचा

विकास करण्याचीं योजना सरकारने केली. सापुतारा भागात तीनचार टेकड्या आहेत. सापुताऱ्याच्या उत्तरेला मालेगाव आणि कोतान्बर ही खेडी एकहजार फूट खाली आहेत. मालेगावचा भाग सपाट पठारासारखा आहे आणि हिल स्टेशन म्हणून विकास पावल्यावर हा सापुताऱ्याचा भाग हिरव्या पाचूनी मढवलेला एक मुकुटच ठेवल्यासारखे होईल. कोन्ताबरच्या टेकड्यांची रांग हँगिंग गार्डन सारखी दिसू लागेल. बिलीमोराहून सापुतारा ७० मैलावर आणि बिलीमोरा येथून जाणारे मोटार मार्ग दाट जंगलातून वळणावळणाने सापुतारा येथे गेले आहेत.

सह्याद्रीचे दोन्ही राज्यास लेणे :

नमुनेदार हिल स्टेशन म्हणून या सापुताराचा उल्लेख पुढे-मागे करावा लागेल. भाषावारीं प्रांत रचना होऊन वेगवेगळी राज्ये झाली, पण सह्याद्रींने महाराष्ट्राप्रमाणे गुजरातलाही हे लेणे दिले. गुजरातेतून सह्याद्रीच्या दोन रांगा गेल्या आहेत. यांच्या उंचवट्यावर सापुतारा येते. भोवतालच्या पंधरा मैलांच्या हिरवळीचे परिसर या उंचवट्यावरून दृष्टीक्षेपात येतात. त्या हिरवळीभोवती बऱ्याच टेकड्या आहेत. महाबळेश्वरला ' पॉइंट ' वरून निसर्गदृश्ये पाहाण्याचा आनंद मिळतो, तशी सोय येथे करण्यात येत आहे,

सापुतारा हा साप-उताराचा अपभ्रंश आहे. साप चावलेल्यास या जागी आणले की सापाचे विष उतरते, अशी समजूत. त्यातूनच सध्याचे नाव पडल्याचे सांगतात.

भाषावारी प्रांतरचना झाल्यावर मूळ गुजराथमधले 'माऊंट अबू' राजस्थानला गेले. गुजरातला थंड हवेच्या ठिकाणाची उणीव होती. नवे

राज्य झाल्यावर हिल स्टेशनचा प्रश्न राज्यकर्त्यांच्यापुढे आला. राज्यातील पाचसहा ठिकाणी त्यासाठी पहाणी करण्यात आली. या कामासाठी नेमलेल्या कमिटीने शेवटी सापुतारा ही जागा हिल स्टेशनसाठी निवडली व पुढे त्या दिशेने कामाला सुरवातही झाली.



डांगमधील आदिवासी तरुणी

निसर्गाने नटलेला रमणीय सापुतारा :

डांग जिल्हयाचे मुख्य ठिकाण अहवा, तेथून पंचवीस मैलावर सापुतारा येते. बिलमोरापासून सत्तर व नाशिकापासून पन्नास मैलावर ते आहे. समुद्र सपाटीपासून बत्तीसशे फूट उंचीवरचा हा भाग, येथे कमाल तपमान ८० फॅरनहाईट म्हणजे हवा थंड व आल्हाददायक आहे. सर्वसामान्यपणे सरासरी शंभर इंच पाऊस पडतो. दाट झाडी हिरवळ

अशांनी हा परिसर रमणीय झालेला आहे व त्याच्या जोडीला तेथे ये-जा करण्याला वाहतुकींचीं सोयही चांगलीं आहे. सारा सापुतारा परिसर तीन-चार टेकड्यांनी नटलेला, त्या आसपासच्या खेड्यांपासून पाच-पाचशे फूट उंच आहेत, पूर्णपणे विकसित झाल्यावर हिरव्या पाचूंनी मढवलेल्या किरीटासारखा कोंतावरची टेकडी हँगिंग गार्डनप्रमाणे शोभिवंत होईल, अशी निसर्गाचीं साथ सापुताऱ्यास लाभली आहे.

सापुताऱ्याचा योजनाबद्ध विकास :

योजनाबद्ध आखणी करून विकास चालू असलेले हे भारतातील पहिलेच हिल स्टेशन होय. येथे बारा महिने ये-जा करता येईल असे डांबरी रस्ते आहेत. विकासाचे विविध प्रश्न हाताळण्यासाठी आर्किटेक्टस् सव्हेअर्स व इंजिनीयर्स यांच्यातून निवडक प्रतिनिधींची सरकारने कमिटी नेमली असून, त्यांनी नव्या हिलस्टेशनची आखणी केली, योजना आखली. साऱ्या योजना अंमलात येण्याला थोडा कालावधी लागेल हे खरे असल्याचे अधिकारी सांगत होते. इतर योजनाबरोबर या भागात नवीन वनराजी लावण्यात येत आहे. त्यातहि सौंदर्यदृष्टी आहे आणि वृक्षराजीने हे आल्हाददायक स्थळ व्हावे असा सारा प्रयत्न आहे.

उद्याने, बगीचे वाढीवर रोख :

नव्या इमारती, बंगले यांची योजना येथे आहे, पण उद्याने व बगीचे यांच्या वाढीवर भर देण्यात येत आहे. पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीजपुरवठा या सोई तेथे केलेल्या आहेत, याशिवाय करमुणुकीसाठी सार्वजनिक हॉल्स, खुले नाटचगृह, स्टेडियम, मुलासाठी बाग, म्युझियम ऑडिटोरियम, इतकेच नव्हे तर, बोटिंग क्लब अशा योजनाहि सापुतारा हिल स्टेशनच्या मास्टर प्लॅनमध्ये आहेत. अद्ययावत हॉटेल्स,

रेसिडेन्सियल स्कूल, फिजीकल ट्रेनिंग, स्काऊटिंग यासाठी कँपिंग ग्राऊंड, आधुनिक शहरासाठी बाजारपेठ येथे होत आहे. आता या सोईबरोबर सापुतारा गावची कायमची वस्तीहि वाढेल व हिल स्टेशनवर ये-जा करणाऱ्यांना ते सुलभहि होईल.

हॉली-डे होमची योजना :

हॉली-डे होमचीहि योजना विकासाचे मास्टर प्लॅनमध्ये आहे. येथल्या अगदी पहिल्या टेकडीवरच त्यासाठी जागा ठरविली आहे. या हॉलीडे होममध्ये फर्निचर सर्व सोईसुध्दा आहेत. स्वतः स्वयंपाक करणाऱ्यासाठी भांडीकुंडीहि पुरवण्याची व्यवस्था येथे होत आहे. आज दोन हॉलिडे होम्सची बांधणी पुरी झालेली आहे. याशिवाय विद्यार्थी, शेतकरी, कामगार असे गटागटाने येणारे लोक, त्यांच्यासाठी मोठे हॉल, येथे योजले आहेत. ज्यांना स्वतः स्वयंपाक करावयाचा नसेल त्यांचेसाठी कँटिन होणार आहे. दोन मोठे हॉल, एक कँटिन आता सापुतारा येथे प्रत्यक्ष सुरूही झाले. शिवाय 'सर्किट हाऊस,' विश्रामगृह व टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर यांच्याहि योजना आहेत.

दोन टेकड्यात तलाव योजना :

आणखी एका दृष्टीने या ठिकाणाकडे पाहिले जाते. दोन मोठ्या टेकड्या येथे एकत्रित होतात. त्या नीटपणे जोडून घेतल्या की मोठा तलाव तयार होईल. त्यातून कायमचा पाणीपुरवठा होईल. हवेत आजच्यापेक्षा अधिक थंडावाहि येईल. कायम किंवा सीझनसाठी राहावयास येणाऱ्या लोकांना लहान-मोठे बंगले बांधण्यासाठी सवलतीने जागा देण्याचीही सरकारची योजना आहे. गुजरातच्या दक्षिण प्रवेश–द्वारीच असे हे आकर्षक व निसर्गसुंदर हिलस्टेशन आहे. भोवताली

डांगचा जंगल परिसर असल्याने मूळ निसर्गास त्याची स्वाभाविक जोड मिळाली आहे.



आमची दिंडी नाशिकहून गुजरातमधील नवीन तयार होत असलेल्या सापुतारा हिल स्टेशनला आली. या ठिकाणी एका झाडाच्या खोडात मारुतीच्या मूर्तीसारखा आकार झाला आहे. हे ठिकाण अहवा गावाहून दोन मैलावर नवापूर रोडवर आहे.

सापुताऱ्याहून पुढे जाताना गर्द झाडी आम्हाला लागली. जाताजाता एका गोष्टीचा उल्लेख येथे केला पाहिजे. अहवाहून दोन मैलावर नवापूर रोडवर झाडांच्या बुंध्यातून निसर्गतःच उभ्या मारुती सारखा आकार निर्माण झाला आहे. त्यावर कोण्या हनुमान भक्ताने झेंडाहि लावून टाकला आहे. आम्ही सापुतारा मागे टाकून पुढे चाललो होतो, त्यावेळी मध्यरात्र उलटून गेलेली होती. अशावेळी त्या नीरव

शांततेचा भंग करीत काहीतरी सामुदायिक गाण्याचा कार्यक्रम चालल्याचा आवाज दाट झाडीतून येत होता. आम्ही गाड्या थांबवल्या–

रात्रीचे वेळी डांगांचे मनमोकळे नाचगाणे
शिंग फुंकताच जोम, यात्रेकरूसुद्धा रमले

आवाजाच्या रोखाने जंगलात गेलो, तेथे डांगी लोकांची छोटी वस्ती होती. दुसरे दिवशी चैत्र पौर्णिमा म्हणून रात्रभर डांगी मुलांची नाच-गाणी चालली होती. आमच्यापैकी काही ते पाहाण्याला थांबले. एकमेकांच्या गळयांत हात घालून वीस-पंचवीस मुलांची त्यानी माळ केली होती. त्या माळेचे एक टोक जागेवर स्थिर व दुसरे घाण्याच्या बैलाप्रमाणे गोलाकार फिरे व त्याबरोबर गाणी चालत. आमच्या शिंगाड्याने शिंग फुंकल्यावर या डांगी मुलांना नवा जोम आला व त्यानी दुसरा नाच करून दाखविला.

डांगी जात अडाणी, पण पराक्रमी, धाडसी, बांबूच्या झोपडीत राहून जीवन कंठतात. त्यांच्या सान्निध्यात आम्हा यात्रेकरूना त्या मध्यरात्रीचा काही काळ कंठता आला, जंगलातून मोटारी निघाल्या आणि उजाडण्याचे वेळी आम्ही बडोदे गांठले.

राजकोटला दरबारी थाटात स्वागत :
संस्कार, संस्कृतीचा अनुभव :

बडोद्याचे सरदार गणपतराव जगधाने, इंदुशेखर हिरोजीराव माने यांनी दिंडीची व्यवस्था केली. त्यांनी सर्वांना थाटाचे जेवण दिले आम्ही बडोदे सोडले व राजकोट गाठले. तेथील व्यापारी श्रीमान्


काकासाहेब लगडीवाले यांनी दिंडीसाठी स्वामीनारायण मंदिरात मोठा मंडप घातला. त्यात प्रत्येकाला गादी, उशी, सारीं सोय केली. सकाळी चहापाणीं व दुपारी पंचपक्वान्नाचे जेवण असा थाट केला.

श्री. काकासाहेब लगडीवाले :



दरबारी थाटाला लाजवील अशी दिंडीतील सर्व स्त्री–पुरुषांची चोख व्यवस्था ठेवणारे श्री. काकासाहेब लगडीवाले. महाराष्ट्रातून राजकोट येथे जाऊन आपल्या कर्तृत्वाने तेथे लौकिक मिळवीत आहेत.

काकासाहेबाचें वडील बाबूराव हे सांगली जिल्हयातले खानापूर तालुक्यातील. दिंडी येणार म्हणून बाबूरावानी मुलांना कळविले होते. त्यामुळे त्यानी सोय केली. काकासाहेबांबरोबर व्यवस्थेला त्यांच्या पत्नी होत्याच. राजकोटला आल्यावर वडिलाना पाहताच काकासाहेबानी त्यांचे पाय धरले. नातवंडे भोवती गोळा झाली. सूनबाई आल्या. त्यांनी वाकून नमस्कार केला. काकासाहेबानी सारी सोय केली. त्याचबरोबर राजकोटमधील प्रमुख व्यापारी, सराफ हेही पंक्तीत वाढीत होते



राजकोटला आमच्या आथित्यशील यजमानांनी आमची बडदास्त उतम ठेवली. आग्रह करताना लाडू पानात न वाढता सबंध लाडू तोंडात घालत. एक खाल्ला की दुसरा !

आणि आग्रह तर किती ? एकेकाच्या तोंडांत सबंध लाडू काकासाहेब घालींत व तो संपताच दुसरा लाडू त्यामागून येई. अशा थाटाची ही पंगत. पुढे वारकऱ्याना पुष्पहार घालून बाबूरावानी सत्कार केला. महिला वारकऱ्यांनाही यजमानीणबाईनी पुष्पहार घातले व त्यावेळी बाहेर ठेवलेल्या आमच्या मोटारीही त्यांनी पुष्पहारानी सजवल्या.

राजकोटला इंडियन ऑईलचे त्या भागाचे विभागीय प्रमुख श्री. खानविलकर हे आले होते. त्यांनी आपला फोन नंबर दिला.

कोठे अडचण आली तर कोणत्याहि पेट्रोलपंपावरून फोन करा असे सांगितले.

अशा थाटाचा कार्यक्रम संपवून आम्ही पुढे निघालो. सोरटी सोमनाथला पोचलो.

☆ ☆ ☆

सात्विक वाङ्मयाची मेजवानी :


'देशाची दुसरी बाजू' सुरू करून वाचकांना सात्त्विक वाङ्मयीन मेजवानीच दिली आहे. दुसऱ्या लेखातील सह्याद्रीच्या दोन रांगातील उंचवट्यावरील सापुतारा व त्याची व्युत्पत्ति, आणि निसर्ग सौंदर्यवर्णन, डांगीं लोकांची छोटी वस्ती, त्यांची नाचगाणीं, प्रवासातील शिंगाड्याने शिंग फुंकल्यावर आलेला नवा जोम, नवपुरा रोडवर झाडाच्या बुंध्यातून निर्गताच झाडाच्या खोडात निर्माण झालेले उभ्या मारुतीचे चित्र पाहून आपोआपच हात जोडले गेले. बडोद्यातील दिंडीची व्यवस्था व थाटाचे जेवण, त्याचप्रमाणे राजकोट येथील, थाटाचे स्वागत, आतिथ्यशील यजमानांनी अशा महर्गतेचे दिवसातहि विलक्षण आग्रहाची मेजवानी व 'सकाळ' मधील बोलके चित्र पाहुन फारच गंमत वाटली आणि 'राजकोटी' आग्रहाची कल्पना आली !

भा. रा. पडतुरे, पुणे.

○ ○ ○

:३:

सोरटी सोमनाथ मंदिर



बारा ज्योतिर्लिंगापैकी सौराष्ट्रातील प्राचीन शिवस्थान सोमनाथ. इतिहास काळात हे देवालय उध्वस्त झाले. स्वातंत्र्यानंतर सोमनाथाची पुन्हा प्रतिष्ठापना झाली.

पवित्र द्वारका नगरी :

बडोद्याहून गडीयामार्गे सुरतवरून रात्री राजकोट गाठले. पुढे जामनगर करून खंबालियामार्गे द्वारकेला पोहचलो. गोमतीचे स्नान आणि कृष्णदर्शन करून मिठापूरचा सिमेंट कारखानावरून बेट द्वारकेला गेलो. समुद्राच्या खाडीतून तीन फर्लांग बोटीने जाऊन तेथे बेट द्वारका आहे. तेथे श्रीकृष्ण परमात्म्याचे दर्शन घेतले. या ठिकाणी कृष्णाची सोन्याची द्वारका होती, असे सांगतात.

बडोद्याच्या पश्चिमेस २७० मैलावर हे पवित्र क्षेत्र आहे. येथे श्रीकृष्ण व बलराम यादवासह राहत. ही नगरी प्रथम भूमीवरच होती. परंतु जरासंध व कालयवन हे वारंवार येऊन त्रास देऊ लागल्याने विश्वकर्म्याकडून तिची स्थापना श्रीकृष्णाने समुद्रात करविली होती. येथे आद्य शंकराचार्यांचे पश्चिम पीठ आहे. हिंदु यात्रेकरू येथे नेहमी मोठ्या संख्येने लोटतात. श्रीकृष्णाने देह विसर्जन केल्यावर द्वारका समुद्रात बुडाली. त्याचा नातू वज्रनाभ याने सागर तीरावर नवी द्वारका उभारली तीच सध्याची द्वारका, अशी पुराणातील माहिती आहे.

कृष्णावर रुक्मिणी रुसली, द्वारकेबाहेर बसली तिचे हे देऊळ – पुजारी सांगत, असा हा संसार भगवंतासहि चुकवता आला नाही !

कृष्णाचे दर्शन घेऊन समुद्र ओलांडून परत जात असताना वाटेत रस्त्यावरच रुक्मीणीचे देवालय होते. तेथे आम्ही उतरलो. रुक्मीणी कृष्णावर रागावली आणि गावाबाहेर बसली, ती ही जागा, असे पुजारी सांगत होता. पुढे पोरबंदर लागले. तेथील

गांधी स्मारक, सुदामपुरीमधील सुदामजीचे दर्शन घेऊन मध्यरात्री आमचा प्रवास चालू झाला, तो पहाटे सोरटी सोमनाथपुढील समुद्राच्या वाळवंटात उजाडेपर्यंत मुक्काम! काठेवाडातील जुनागड भागात हे शिवाचे स्थान आहे. 'सौराष्ट्र सोमनाथ' याचा अपभ्रंश होऊन याचे नांव 'सोरटी सोमनाथ' झाले. पुरातनकाळापासून प्रसिद्ध असलेले हे मंदिर आहे. गझनीच्या महंमदाने यावर स्वारी केली व इ. स. १०२४ मध्यें रजपूतांचा पराभव करून सोमनाथाची मूर्ती फोडली व अपार संपत्ती गोळा करून गझनीला नेली. या देवळाचे मागे भाटकुंड नांवाचे कुंड असून श्रीकृष्णाने येथे देह विसर्जन केला, असे म्हणतात. स्वातंत्र्योतर काळात मे १९५१ मध्ये भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष स्वर्गीय श्री. राजेंद्रप्रसाद यांचे हस्ते सोमनाथाची पुन्हा प्राणप्रतिष्ठा झाली व पुन्हा भव्य मंदिर बांधण्यात आले.

कालिदासाची क्षिप्रा :

तेथून प्रभास क्षेत्र की जेथून श्रीकृष्ण निजधामास गेले. भिल्लाने मारलेला बाण श्रीकृष्णाच्या पायाला चुकून लागला, ते मंदिर करून जुनागडला श्रीसंत नरसिंह मेहता यांच्या क्षेत्रात आलो. जवळचा गिरनार पर्वत, तेथील कड्यांची पडझड झाल्याने जाता आले नाही.

यानंतर डाकोरला जाऊन यात्रा पुढे चालू झाली आणि गुजरात हद्द संपली. मध्यप्रदेश राज्याचा भाग सुरू झाला. इंदूरमार्गे मोटकका येथील जागृत ज्योतिर्लिंग नर्मदेच्या तीरावर श्री ओंकारेश्वर येथे जाऊन ज्योतिर्लिंगाची पूजा करून परत आलो आणि उज्जैनी गाठली. तेथे क्षिप्रा नदीत स्नान आणि ज्योतिर्लिंग श्री महाकालेश्वर याची पूजा, भजन केले.

कालिदासाने मेघदूतात वर्णन केलेले बलाक किंवा बगळचांचे थवे, क्षिप्रेच्या दुथडीं बागा, मोर आजहि पाहावयास मिळत. फरक इतकाच की थवे रोडावले, बागा सुकल्या आणि मोर कृश आणि संख्येने कमी झाले होते.

१० दिवसांत २१०० मैल प्रवास :

पुढे जाताना चंबळ खोऱ्यातून रात्रीची वाट होती. दरोडेखोर मानसिंग आणि त्याचे साथीदार यांच्या वाटमारीची भीति असल्याने गुणा या गावी तेथे रस्त्यावरच सर्वांनी मुक्काम केला. प्रवासाचे श्रम थोडे अधिक झाल्याने गाढ झोप आली आणि केव्हा उजाडले हे समजले नाही. पुढे आग्रा येथे आलो. यावेळी आमचा हा सारा प्रवास दहा दिवसांत साडेतीन हजार किलोमिटर किंवा २१०० मैल झाला होता. आग्र्याचा ताजमहल, नंतर दिल्ली कुतुबमिनार, मथुरामार्गे गोकुळ आटपून वृंदावन यमुनेतील स्नान आटोपून इंद्रप्रस्थ, कुरुक्षेत्र ही तीर्थे गाठली आणि चंदीगडमार्गे अमृतसरकडे आमच्या गाड्या चालू लागल्या. वाटेत भाक्रा-नानगल धरण हे एक मोठे आकर्षण होते.

पुढच्या कार्यक्रमात इंदोर येथील जैनांचे कांच मंदीर पाहाण्यासाठी सर्व मंडळी उतरली. नव्या पैशाएवढ्या वेगवेगळ्या रंगांच्या काचेच्या जाड तुकड्यांनी हे सारे मंदिर आकर्षक पद्धतीने मढविले आहे. चारहि बाजूंच्या भिंती, कोनाडे, कमानी इतकेच नव्हे तर छत आणि जमीन हीसुद्धा काचेने मढविलेली आहेत. असे काचमंदिर काही लहान-सहान नाही. बाहेर पडवी, आत मोठा सभामंडप, मध्ये मंडपात गाभारा, मागील बाजूला आणखी एक

हॉल, आत ते किती किती लांब होते कोणास ठावूक ? मंदिर पाहून लगेच निघायचे अशा सूचना आगाऊ दिल्या असल्यामुळे बहुतेकांनी मंदिराचा पुढचा भाग बघितला व बाहेर शिंग फुंकताच मोटारीत येऊन बसलो, गाड्या निघाल्या.

एक वारकरी मागे राहिला :

मयासुराच्या नगरीत देवांचे भान हरपले, त्याप्रमाणे काच मंदिरात आतील बाजूचा भाग पाहाण्यास एक वारकरी गेला होता. त्याला परतण्याचे ध्यान राहिले नाही आणि तो आत राहिल्याचे आम्हा कोणाच्या ध्यानात आले नाही. इंदौरहून पुढे आम्ही उज्जैनीला आलो, तो तेथे आमचा ड्रायव्हर लक्ष्मीनारायण याची आई व आमचा इंदौरला चुकलेला वारकरी यांची गाठ पडली. काचमंदिराजवळ चुकामुक झाल्यावर तो वारकरी तेथे उभा होता. आमचा ड्रायव्हर इंदौरचाच. त्याची आई तेथे योगायोगाने आली होती. तिने त्याची चौकशी केली, त्याला घरी नेले, जेवणखाण घातले आणि उज्जैनीला आणून आमच्या स्वाधीन केले आणि आमच्यातला चुकलेला वारकरी परत आला म्हणून आम्हाला आनंद झाला.

सात ज्योतिर्लिंग दर्शनाचा लाभ :

नामदेव जयंतीसाठी पंजाबकडे जाताना आणि परत येताना केलेल्या या तीर्थाटनात ज्योतिर्लिंगाचे दर्शन हा एक भाग प्रमुख होता. भारतात एकूण बारा ज्योतिर्लिंगे आहेत. एक त्र्यंबकेश्वर, दुसरे विश्वेश्वर (काशी), तिसरे महांकाळेश्वर (उज्जैनी म. प्रदेश), चवथे सोरटी सोमनाथ (सौराष्ट्र), पाचवे नागनाथ (औंडे मराठवाडा), सातवे ओंकारेश्वर (नर्मदा तीरावर) या सात ज्योतिर्लिंगाचे दर्शन या यात्रेत

घेता आले. (१) घृणेश्वर (वेरूळ–मराठवाडा), (२) भीमाशंकर (भीमा नदीच्या उगमस्थानी), (३) रामेश्वर (दक्षिण भारत), (४) नागार्जुन (मल्लिकार्जुन गावी), (५) केदारेश्वर ही पाच ज्योतिर्लिंगे अजून राहिली आहेत. परमेश्वराने संधी दिल्यास तीही करण्याची उमेद आहे.


प्राचीन काळी शिवभक्तांनी ज्योतिर्लिंगांची स्थापना ठिकठिकाणी केली ती हीं १२ ज्योतिर्लिंगे होत. यापैकी ओंकारेश्वर हे नर्मदा तीरावर मध्य प्रदेशात नेमाड जिल्हयात उंच डोंगरावर आहे. दोन उंच टेकडयांमधून नर्मदा नदीने येथे मुसंडी मारली आहे. साबणाचा बार सुरीने कापला म्हणजे भिंतीप्रमाणे तो सरळ कापला जातो, तसेच नर्मदेच्या प्रवाहाच्या जोराने डोंगर दोन्ही बाजूला कापून जणू भिंत बांधली आहे आणि अशा या दोन डोंगरांच्या भिंतीतून नर्मदेचे निर्मळ पाणी वहात आहे. तीनशे फूट खोल उतरत नावेतून नर्मदा ओलांडावी लागते आणि पलीकडे पुन्हा ३०० फूट चढून जाऊन ओंकारेश्वराची पूजा करता येते. असे सांगतात की याच ठिकाणी श्रीं शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रावरील भाष्य लिहिले.

द्वारकेत ते ऐश्वर्य तर गोकुळात श्रीकृष्णाची अनावस्था दिसली. श्रीकृष्ण मंदिरात तेथे दिवासुद्धा नव्हता. पण मथुरा, वृंदावन येथे चांगली व्यवस्था होती.


यमुना नदीत आपल्याकडे मासे असतात, तसे तिकडे कासवे होती. स्नान करण्यास त्यांचा उपद्रव होत नाही, पण नदीत ठेवलेला पाय कासवाच्या पाठीवर पडून घसरतो की काय असे वाटे.

दिल्लीला लाल किल्ल्यासमोरील उघडचा पटांगणात आमचा मुक्काम होता. सकाळीं नदीत सर्वांनी स्नान केले. महात्माजी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या समाधींचे दर्शन घेतले. बिर्ला मंदिरातील सर्व भाग पाहताना हीच का पांडवांची जागा, असे आमच्या बरोबरच्या काही खेडूत महिला विचारत होत्या.

चव्हाणांची भेट :



दिंडी दिल्लींत पोहोचली. अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांना वारकरी भेटले. दिंडीप्रमुखांचे वडील सोपानकाका देहूकर श्री. यशवंतराव यांना श्रीफळ देत असताना.



दिल्ली येथे अर्थमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांची त्यांच्या बंगल्यावर दिंडीतील वारकऱ्यांनी भेट घेतली त्यावेळचे चित्रात डावीकडून दिंडीचे प्रमुख ज्ञानेश्वर माऊली देहूकर, यशवंतराव चव्हाण व समोर उभे 'सकाळ' वार्ताहर जि. स. बागलकोटे.

यशवंतराव चव्हाण यांनी आमच्या या दिंडीच्या उपक्रमाबद्दल विशेष आस्था दाखविली. त्यांच्या बंगल्यावर आम्ही सर्वच वारकरी गेलो. यशवंतराव यांनीं दिंडीची आस्थेने चौकशी केली. दिंडीत 'सकाळ'चा बातमीदार पाहताच त्यांना मोठे आश्चर्य वाटले. मिरजेला ब्रॉडगेजचे उद्घाटन करून आल्याचीं माहिती त्यांनीं सांगितली. पंजाबमधील घुमान येथे नामदेव जयंतीच्या सोहळ्याला खुद्द आपण येणार होतो, परंतु ऐन कामाच्या गर्दीने शक्य झाले नाही, असे ते म्हणाले. परंतु आपल्या सेक्रेटरीला बोलाविले आणि घुमान गाव असलेल्या बेहरामपूरला जिल्ह्याच्या कलेक्टरना फोन करून आमच्या दिंडीला त्यांनी जरूर ती मदत देण्याची सूचना देण्यास आमच्या समक्ष सांगितले.

कलेक्टरला निरोप पोहोचला का नाहीं, हे आम्हाला कळले नाही. परंतु राजालाही मागे पाडील असे आतिथ्य करावयाला वारकरी भगवद्भक्त आणि धर्मप्रिय जनता उदारहस्ते ठिकठिकाणी उभी होती, त्याचा मात्र अनुभव आला. यशवंतराव चव्हाण हे देवराष्टे गावचे, जवळच मोहित्याचे वडगाव हे गांव आहे. या गावची एक म्हातारी आमच्या दिंडीतून एकटीच आली होती. यशवंतराव चव्हाण लहान होते तेव्हां आपण त्याना खेळविले आहे, असे ती म्हणत होती. चव्हाणसाहेबाना हे सांगून त्या म्हातारीची गाठ घातली. त्यांनी तिला नमस्कार केला, तिची विचारपूस केली.

☆ ☆ ☆

भारतीय आदर्शांची प्रचीति :

नामदेव दिंडीच्या तिसऱ्या बातमीपत्रात यशवंतरावजींच्या भेटीचा प्रसंग वाचून फार आनंद वाटला. आपणाला लहानपणी सांभाळणारी एक म्हातारी या दिंडीत आहे हे कळताच, यशवंतरावांनी तिला आदरपूर्वक नमस्कार केला. पोकळ मोठेपणाने दुरूनच विचारपूस करून त्यांनी सोडून दिले नाही. वडीलकीचा मान ठेवण्याची भारतीय संस्कृति त्यांच्या अंगी दिसून आली. आजच्या नट–नटी छाप तरुण–तरुणीपुढे अशी आदर्श उदाहरणे आवश्य यावयास हवीत.

बी. ए. तळेगावकर पुणे.

वाचक हृदयात साठवून ठेवील :

'देशाची दुसरी बाजू' म्हणजे धर्मोन्नति आणि श्रद्धा. त्यासाठी 'सकाळ'कारांचे नेहमीच काही ना काही उपक्रम चालू असतात. त्यांपैकीच 'पंढरपूर ते घुमान (पंजाब)' या पाच हजार मैल यात्रेचे दिलेले प्रवास वर्णन वाचक आपल्या हृदयात साठवून ठेवील. देश इथून तिथून सारा एक, ही भावना अशा लिखाणानेच रुजू लागेल.

पी. एल. कांबळे, घोरपडी, पुणे.

○ ○ ○

: ४ :

तुकडोजीमहाराजांची आकर्षक समाधी

या यात्रेत दिल्लीला महात्माजी, लाल बहादुर शास्त्री आणि अमरावतीजवळ गुरुकुंज येथे संत तुकडोजी महाराज अशा अलीकडच्या तीन थोर पुरुषांच्या समाध्या बघावयास मिळाल्या. तिन्ही ठिकाणी स्वच्छता, टापटीप, बागबगींचा व्यवस्था नमुनेदार होती. महात्माजी आणि लाल बहादुर शास्त्री यांची समाधी–स्थाने काळचा संगमरवरी चौथऱ्यांची आहेत. पण तुकडोजी महाराजांची समाधि वेगळचा प्रकारची आहे.

तेथे एक हौद आहे. त्या हौदात एक नाव आहे. नावेवर समाधि आहे आणि या समाधीवर शेषशाई भगवान फडा पसरून सावली देत आहे, असे सूचित करणारा सारा भाग सिमेट काँक्रीटचा केला आहे. हौदही सिमेंटचा, नावही सिमेंटची व शेषशाईहि सिमेंटचा आहे असे हे चित्र. भव–नदी पार पाडण्यासाठी नौकेतून महाराज जात आहेत, असे सुचविले आहे.

उत्तरेकडील मंदिरात, नेहमी दर्शन घडत नसते. गाभाऱ्याच्या दारावर पडदा सोडलेला असतो. दर्शनउत्सुक भक्तांची गर्दी बाहेर झालेली असते. ठराविक वेळी पडदा उघडतात आणि मग दर्शन घेतात. सामान्यपणाने देवाच्या दर्शनाकडे माणसे धाव घेत असता पुढे हात पसरणाऱ्या पंड्यांचा त्रास जाणवतो.

: ४ :

देशाच्या प्रगतीचे प्रतिक - भाक्रा नानगलचे प्रचंड धरण

भाक्रा-नानगल धरण देशाच्या प्रगतीचे प्रतीक आहे, असे पंडित नेहरू म्हणत त्याचा प्रत्यय भाक्रा-नानगल धरण पाहून झाल्यावर आला. सातशे चाळीस फूट उंचीचा हा सिमेंट काँक्रीटचा बंधारा आहे. दिल्लीला उंचच्या उंच कुतुबमिनार पाहिला होता. त्याच्या तिप्पट उंची या धरणाची आहे. धरणाने तयार केलेला तलाव ६५ मैल लांबीचा झाला आहे. एकेचाळीस हजार सहाशे ऐंशी एकर त्यांचे क्षेत्र आहे. या तलावाचा कॅचमेंट एरिया २२ हजार चौ. मैल आहे. हा प्रचंड बंधारा बांधायला १५ वर्षे (१९४८ ते १९६३) लागली. तेरा हजार कामगार आणि तीनशे इंजिनीयर्स रात्रंदिवस काम करीत असत.

पृथ्वीभोवती ८ फूट रुंदीचा रस्ता तयार होईल एवढे काँक्रीट धरणाच्या कामास वापरण्यात आले

५५ लक्ष क्युबिक काँक्रीट या बंधाऱ्यासाठी लागले. हे काँक्रीट किती ते सांगताना तेथील इंजिनीयर म्हणाले की एवढ्या काँक्रीटमधून या पृथ्वीभोवती आठ फूट रुंदीचा रस्ता तयार झाला असता यावरून हे काम केवढे मोठे होते याची कल्पना येईल. काँक्रीटसाठी १ लाख टन लोखंड वापरले अशी माहिती मिळाली.

६५ लाख एकर जमीनीला पाणी :

असे हे भाक्रा-नानगल धरण झाल्यामुळे पंजाब, हरियाना आणि राजस्थान या तीन राज्यातील ६५ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होत आहे. त्यासाठी काढलेल्या कालव्याची लांबीच ५ हजार कि. मी. आहे. रस्त्यातून जाताना रस्त्याच्या बरोबरीने या कालव्याचे पाट वाहत होते. भाक्रा धरणामुळे उ. हिंदुस्थानातल्या शेतीत आणि उद्योगधंद्यात मोठी क्रांती झालेली आहे. दरवर्षी दोनशे कोटी रुपयाचे जादा अन्न-धान्य म्हणजे ८.५ लाख टन जादा त्या भागात दरसाल होऊ लागल्याचे तेथील अधिकारी सांगत होते. एवढेच नव्हे तर कापसाच्या जादा ६ लाख गाठी, ऊस जादा १५ लाख टन, जवस, शेंगदाणा वगैरे ३६ हजार टन असे उत्पादन त्या भागात वाढले आहे.

२३० कोटी रुपये खर्च :

एवढ्या या अभूतपूर्व योजनेसाठी दोनशे तीस कोटि रुपये खर्च झाले. दोन पॉवर प्लॅन्टस येथे सुरू केली आहेत. त्यातून पंजाब, हरियाना, राजस्थान, दिल्ली, जम्मू, काश्मीर आणि हिमाचलप्रदेश अशा राज्याना वीजपुरवठा होत आहे.

हिमालयाने दिलेली संपत्ती :

सतलज नदीवरचे हे धरण तयार झाल्यामुळे ईश्वराने या नदीच्या रूपाने तेथे हिमालयातून येणाऱ्या जलसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग आपल्या लोकांच्या सुखासाठी होऊ लागला आहे. धरण असे बांधले आहे की ते ५०० वर्षे खात्रीने टिकू शकेल, असे तज्ज्ञाचे मत आहे. जगात एवढे उंच कॉंक्रीट धरण अन्य कुठे नाही. असे हे धरण त्या भागात

झाले आणि बारा महिने शेतातून पिके निघू लागली, समृद्ध झाली. अशा समृद्ध भागातून आमचा हा प्रवास चालला होता.


पंजाबची समृद्धी :

पुढच्या कार्यक्रमात चंदिगड येथून जाताना दोन्ही बाजूला हिरवी शेते झाडीमधून चाललेली गव्हाची मळणी आणि पुरेसे पाणी असल्यामुळे बाहेर मळणी, तर त्याच वेळी शेतात पेरणी असे दृश्य पाहावयास मिळाले. भाक्रा नानगल धरणामुळे या भागात तीन पिके काढतात. अशा समृद्ध भागातून अमृतसरला गेल्यावर तेथे शेतात जसा सधन शेतकरी तसा शहरात सधन व्यापारी, अव्वल दर्जाची कारखानदारी असा हा भाग सुखी जीवनाचा नमुना वाटला. शेतात तिप्पट पीक कारखानदारीतून उत्पादन जास्त आणि पंजाबभागातले तरूण प्रामुख्याने लष्करात असल्यामुळे त्याच्या पगाराचा पैसा अशा तिन्ही बाजूनी तेथे संपत्ती ओसंडत असल्याचे चित्र जाणवले,

अमृतसरचे सुवर्ण मंदिर :


चंदीगड, जालंदर करून आम्ही अमृतसरला आलो. तिकडे भाषा पंजाबी. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातील तलावात स्नान करून सुवर्ण मंदिरात जाऊन आलो. जमिनीलगतचा २-३ फूट भाग सोडल्यास सारे मंदिर नक्षीकाम केलेल्या सोन्याच्या पत्र्याने मढविले आहे. आहे सकाळची सूर्याची सोनेरी किरणे सुवर्ण मंदिराच्या सोन्याच्या पत्र्यावर पडली की सारे मंदिर चकाकू लागे आणि तलावात सुवर्ण मंदिराचे सोनेरी प्रतिबिंब पाण्यात दिसू लागे आणि पाणी हलताना सोनेरी प्रतिबिंबही हलू लागे. जणू काही तेथे येणाऱ्याचे स्वागत या प्रतिबिंबाच्या रूपाने करण्यात येत आहे.

" नामदेवकी घुमानी "



पंजाबमधील घुमान येथील संत नामदेव मंदिराचा पुढचा भाग.
मंदिराचे आतील बाजूस नामदेव महाराजांचे स्मारक आहे.

नामदेवाच्या पायांपाशी :



घुमान येथील नामदेव मंदिराचे सभागृह.
नामसंकीर्तन यात्रा पंजाबचा समृद्ध प्रदेश पाहूनच येथे पोचली.

भालदार चोपदार सज्ज झाले, शिंगाड्याने शिंग फुंकले सारा गावच दिंडीकडे लोटला


घुमानी गावच्या वेशीबाहेर गाड्या थांबल्या. सारे वारकरी खाली उतरले. टपावरील पताकांच्या काठ्या खाली काढून त्यांना पताका जोडल्या, दोन उंच जरीपटके फडकविण्यात आले. लाल डगले घालून चांदीच्या काठ्या घेऊन भालदार चोपदार सज्ज झाले.

दिंडोबरोबर शिंग फुंकणाराहि आला होता. त्याने शिंग फुंकले व ललकारी झोडली. दोन रांगा करून वारकरी उभे होते. मागील बाजूला महिला वारकरीहि सज्ज होत्या. प्रत्येकाच्या हातात टाळ आणि खांद्यावर पताका असा सारा संच तयार झाला. दिंडीचे प्रमुख श्री. ज्ञानेश्वर माऊली देहूकर महाराज यांनी आपले पिताजी सोपानकाका यांच्या पायावर मस्तक ठेवले आणि 'पुंडलीक वरदा हरी विठ्ठल' चा जयघोष करून ललकारी झोडली आणि 'ज्ञानबा तुकाराम'चा गजर एका सुरात होऊ लागला. वारकऱ्यांची पावले तालानुसार पडू लागली आणि दिंडीचे पाऊल पुढे पडले.



नामदेवांचे पंजाबातील स्वरूप

हे होत असताना जवळपासच्या घरातील लहान-लहान मुले, बायका दारात येऊन पाहू लागल्या. गांवातून एकामागून एक लोक येऊ लागले आणि थोड्याच वेळात तो भाग माणसांनी फुलून गेला. नामदेव मंदिराचे शिखर या वेळी दिसत होते. त्याच्या पुढचा भागहि दृष्टीपथात होता. अशा स्थितीत 'तुम्हारा चौधरी कौन है?' अशी एका शिखानीं



घुमान येथे नामदेव मंदिराच्या आवारात भजन चालू आहे. शिंगाडचा शिंग फुंकीत मध्ये उभा आहे. डाव्या बाजूस मराठी माणसे असून त्यांच्या उजव्या बाजूस काही स्थानिक पंजाबी माणसे दिसत आहेत.

चौकशी केली. ज्ञानेश्वर माऊलींची भेट त्याना करून दिली, या सुमारास आमची दिंडी नामदेव मंदिराच्या महाद्वाराजवळ आली.

महाद्वारात स्वागत :

नामदेवाचे कुणी भक्त आले आहेत. हे मंदिर चालकानी ओळखले आणि त्यांनी ज्ञानेश्वर माऊली आणि त्यांचे वडील सोपानकाका यांच्या गळचात हार घालून महाद्वारात स्वागत केले. दिंडी मंदिरात गेलीं. मंदिराच्या प्रशस्त पटांगणात पुन्हा जयघोष करीत त्या संतशिरोमणी नामदेव महाराजांच्या स्मारकाचे दर्शन झाले.

मंदिराची रचना :

'नामदेव की घुमानी' असा उल्लेख या भागात केला जातो. अशा या घुमान गांवालगत हे प्रशस्त नामदेव मंदिर आहे. नामदेव मंदिर अशी देवनागरी लिपीतील संगमरवरी शिळा आहे. प्रवेशद्वाराच्या बाहेरील बाजूस उजव्या बाजूला पुरुषाचे व आतील बाजूस महिलांचे स्नानगृह आहे. महाद्वारातून आत गेल्यावर उजव्या बाजूला एक विहीर आहे. त्या विहिरीवर रहाट बसविला आहे. एका छोटचाशा हौदात पाणी साठविले आहे. मंदिरात जाताना या हौदातील पाण्याने प्रथम पाय धुवून मंदिरात जावयाचे, अशी येथील प्रथा आहे.

विहीरीजवळ एक भोजनगृह आहे आणि त्याला लागून मोठी पडवी आहे. तेथे जेवणाची व्यवस्था आहे.

मंदिरात गेल्यावर सारे अंगण संगमरवरी फरशीने व्यापलेले दिसते त्याला जोडून श्री नामदेवरायाचे पूर्व-मुखी मंदिर आहे. या

मंदिरात 'बाबा नामदेव की समाधि' असे ज्याला म्हणतात, ते संगमरवरीं कट्टयाचे स्थान आहे.

नामदेवरायांचे स्मरण :

नामदेवरायाची समाधि पंढरपूरला महाद्वाराची पहिली पायरी हीच होय, हीं गोष्ट संशोधकानी स्पष्ट केली असली तरी, नामदेवरायाच्या नावाने या मंदिरात हा सहा फूट उंचीचा कट्टा त्याच्यावर पितळीं पत्र्यावर नामदेवरायाचे कोरलेले चित्र आणि या दोन्हीवर मिळून सुरेख मेघडंबरी हे चित्र समाधि असो वा नसो, नामदेवरायाचे स्मरण करून देणारे आहे हे खास ! त्याला आपण स्मारक म्हणू, नामदेव मंदिरातच नामदेव महाराज झोपत तो पलंग आहे. या पलंगाच्या पायथ्याशी भाविक भक्त नतमस्तक होतात.

○ ○ ○

: ५ :

नामदेवांच्या जीवनातील चार घटना


दोन्ही बाजूस नामदेवरायांच्या जीवनातील चार घटना चित्रित केल्या आहेत. नामदेवरायाच्या स्मारकाच्या कट्टयावर थोडा उंचवटा आहे. त्यावर उंची वस्त्र घातलेले असते. त्यांच्या चित्राच्या बाजूला मेलेलीं गाय नामदेवरायांनी बादशहासमोर जिवंत केल्याचे चित्र आहे. दुसऱ्या चित्रात गाई चारण्यासाठी नामदेवराय जंगलात गेले असता प्रत्यक्ष परमेश्वराने वाघाचे रूपानें दर्शन दिले, असा भाग आहे. तिसऱ्या चित्रात नामदेवाच्या भांड्यातील दूध देवानी पिऊन टाकल्याची घटना चित्रित केली आहे आणि चवथे चित्र परिसाचा मणी नामदेवरायांनी पाण्यातून काढून दाखवला असा भाग आहे.

हे सारे दर्शन घेताना डोळे भरून आले. मराठी नामदेव पंजाबात येऊन परमार्थाचा प्रचार करीत करीत याच ठिकाणी विसावा घेत असल्याचा भास झाला.

स्मारकाचा अष्टकोनी कट्टा :

नामदेव स्मारकाचा हा कट्टा अष्टकोनी आहे. तळ जमीन पांढऱ्या संगमरवरी दगडांनी बांधून काढली आहे. या समाधीच्या वरील उभ्या पत्र्यावर नामदेवरायांचे चित्र कोरले आहे. हे चित्र आपल्या नामदेवरायांच्या चित्रापेक्षा अगदी वेगळे आहे. डोक्यावर केसाचा जुडा, घोळदार दाढी, डोळे अर्धवट मिटलेले, शांत आणि गंभीर असे हे नामदेवरायांचे चित्र तेथे आहे. गळ्यात तुळशीची माळ, अंगावर जानवे. कंबरेला करगोटचाला गुंडाळलेली लंगोटी, अंगावर ओढलेली कांबळी असे मांडी घालून बसलेले हे ध्यान ह्या पितळी पत्र्यावर कोरले आहे.

घुमान येथील नामदेव मंदिरातील संत नामदेवांचा पलंग




यात्रिक या पलंगाचेहि भक्तीभावाने दर्शन घेतात.

पंचामृत अभिषेकाचा आनंद :

याच स्मारकावर आम्ही पुढे पंचामृताचा अभिषेक केला. पंचामृत घालताना समाधीवरून आम्ही हात फिरवू लागलो त्यावेळी आम्ही त्यांचे हातपाय चोळत आहोत की काय असे वाटू लागले. गरम पाण्यानें ही समाधि धुऊन काढली. टॉवेलने पुसून तीवर महावस्त्र घातले, फुले घातली, आरती केली. मंदिराचा पुजारी सांगत होता की हीं समाधि बांधल्यापासून पंचामृताचा हा पहिलाच अभिषेक होय. तिकडे ओल्या फडक्यानी पुसून वस्त्र चढविण्याची पद्धत आहे. पंचामृताचा अभिषेक हा प्रकारच त्यांना नवीन. आमची भावना म्हणून तो आम्ही केला. मंदिराच्या चालकानाही त्याचा आनंद झाला.

रणजीत सिंगापासून ग्रंथसाहेब :

नामदेव मंदिराला लागूनच त्यांचे शिष्य बोहरदास यांचे मंदिर आहे. नामदेव मंदिराच्या समोरील आवारात मध्यभागी तुळशी–वृंदावन आहे. डाव्या बाजूला अंगणातच लहान घुमटी आहेत. त्या भक्त बोहरदास यांच्या वंशातील प्रमुख व्यक्तींच्या असल्याचे सांगण्यात आले. एका कोपऱ्यात शिवालय, ते मात्र ओबडधोबड. शिवालयाला लागूनच नामदेव मंदिराच्या अगदी समोर सभामंडप आहे. राजा रणजितसिंगांच्या कारकीर्दीपासून येथे ग्रंथसाहेबाचे वाचन सुरू झाले, अशी माहितीं तेथील लोक सांगत होते. सभा मंडपातच राधा–कृष्णाचें मंदिर आहे. पूर्वी विठ्ठल रखमाईच्या मूर्ति होत्या असे सांगतात नामदेवांचे शिष्य बाबा बोहरदास, ते त्यांची नेहमी पूजा करीत, अलिकडे त्या मूर्ति भंगल्यावर राधाकृष्णाच्या मूर्ति स्थापण्यात आल्या.



नामदेवांचे पंजाबातील शिष्य संत बोहरदास यांचे हे मंदिर
नामदेव मंदिराला लागूनच आहे.

पायऱ्या बादशहाने बांधल्या :

नामदेव मंदिराच्या मागिल बाजूला एक तळे आहे. त्याच्या चारी बाजूंना पायऱ्या आहेत. या तळ्याला नामीयाना असे म्हणतात. पंजाबचे महाराणा रणजीतसिंह यांच्या सासूबाई श्रीमती सदाकौर यांनी या तलावाची दुरुस्ती केली अशी माहिती उपलब्ध आहे. तळ्याच्या एका बाजूच्या पायऱ्या दिल्लीचा सुलतान अलम शहा याने इ. स. १४४६ मध्ये बांधल्या. दुसरी बाजू दिवाण चंदूलाल नांवाच्या भक्तानी बांधली बाकीच्या दोन बाजू बोहरदासच्या पुढील वंशजानी बांधल्या.

नामदेवांच्या तपाची जागा :

नामदेवरायांच्या मंदिरापासून एक फर्लांगावर नामदेवराय तप करीत बसत, ती जागा आहे. त्याला तपियाना म्हणतात. बागेसारखे येथे सुरेख आवार आहे. तळघरांत नामदेवरायाची तप करण्याची जागा दाखवितात आणि त्याला लागून एक मोठा बांधीव हौद, समोर ग्रंथ वाचनासाठी एक मोठा हॉल अशा या परिसरात हिरवी झाडीं, रम्य वातावरण यामुळे येथे थोडा अधिक वेळ बसावे असे वाटते.

घुमानमधल्या नामदेवरायांच्या या दोन्ही स्थानासभोवतीं हिरवीगार उंच झाडे, लगतची सुरेख बागायती शेतीं यातून बाराहि महिने वाहाणारे पाट हे सर्वच वातावरण मनाला प्रसन्नता देणारे आहे. महाराष्ट्रात श्री क्षेत्र औदुंबर येथे एक मोठा वटवृक्ष आहे. त्याच्या शीतल छायेत यात्रिकाला आराम वाटतो. पंजाबमध्ये क्षेत्रघुमानमध्ये असे शीतल छाया देणारे अनेक वृक्ष ठायीठायी यात्रीकाच्या स्वागतासाठी नामदेवरायानीच जणु त्याना उभे केले असा विचार मनात सहज डोकावून गेला.


वारकऱ्यांच्या टाळांचे कौतुक :

नामदेवरायांच्या मंदिराच्या उंच घुमटावर चढून पाहता काही झाडांची उंची एवढया शिखराएवढी असल्याचे आम्हाला आढळून आले. असे नामदेवरायांचे पंजाबमधील स्थान बटाला तालुक्यात घुमान म्हणून प्रसिद्ध झाले आहे. या ठिकाणी आम्ही मोटारीतून आलो, ते पाहून वाटेतील गावातून काही माणसे घुमानला आली होती. त्यापैकी रजेवर आलेला मिलिटरीतील एक कॅप्टन होता. वारकऱ्यांच्या हातातील टाळ हातात घेऊन त्याने पाहिले, वाजविले. मराठी माणसाचे टाळ पंजाबी माणूस वाजवीत होता. कारण दोन्हीमध्येहि नामदेव सुप्तरूपाने होता.

भावना हेलावणारा एक प्रसंग :

भावना हेलावून सोडणारा असा एक प्रसंग घुमान येथे घडला. येथील नामदेव मंदिराचे एक जुन्या पिढीतील महंत बाबा पुरनदासजी यानी आपल्या घरी देहूकर महाराजांना बोलावले. मी त्यांच्या बरोबरच होतो. ८७ वर्षाच्या त्या वृद्ध महंताने देहूकर महाराजांचे पाय धुतले, बायकोने पायावर फुले घातली आणि नको नको म्हणत असतानासुद्धा ते पायाचे तीर्थ महंताने, बायकामुलांनी श्रद्धेने आणि भक्तिभावाने घेतले. गोमूत्र शिपडून आपण शुद्धी करतो त्याप्रमाणे उरलेले तीर्थ त्यांनी घरात शिपडले. ते म्हणाले माझ्या नामदेवाच्या दर्शनाला इतक्या लांबून तुम्ही आला, नामदेव भजन कसे करीत, कीर्तन कसे करीत, त्याचे दर्शन तुम्हीच प्रथम आम्हाला दिले.

नामदेवाच्या घुमान गावात पंढरीरायाचे एवढे भक्त तुम्ही आणलेत त्यांचे दर्शन दिले, या पुण्य कार्यासाठी तुमचा हा सत्कार. नामदेवरायाची आठवण पुन्हा करून देणारा महाराष्ट्र आणि पंजाब



पंजाबमधील घुमानच्या नामदेव मंदिरात नामदेव दरबार कमिटीने देहूकर पितापुत्रांना मानपत्र दिले. त्या उर्दू मानपत्राचा मराठी अनुवाद 'सकाळ' चे वार्ताहर श्री. जि. स. बागलकोटे वाचून दाखवीत आहेत. मध्यभागी नामदेव दरबार कमिटीचे सेक्रेटरी बाबागुरु हरमसिंग बसले असून त्यांच्या मागे ज्ञानेश्वर माऊली व उजव्या बाजूस सोपानकाका देहूकर बसले आहेत.

यांची सांगड पुन्हा घालणारा असा हा उपक्रम करणारे नामदेव–रायानंतरचे तुम्हीच थोर संत असे म्हणत असता त्यांचे डोळे भरून आले. महाराजांचे पाय त्याने घट्ट धरले, अशी श्रद्धा या क्षेत्रात आढळली.

ज्ञानदीप लावू जगी :

घुमानचा नामदेव जयंतीच्या कार्यक्रमात नामदेव दरबार कमिटीने आमची जेवणा–खाण्याची आणि चहापाण्याची सोय केली होती. रोज एक पक्वान्नाचा बेत होता. नामीयाना या दुसऱ्या मंदिराच्या चालकाने त्यातून एक वेळ वारकऱ्यांना बोलावून मेजवानी दिली. शेवटच्या दिवशीं वारकरी दिंडीने महाप्रसाद केला. आरतीनंतर नामदेव दरबार कमेटीने देहूकर पिता–पुत्रांना देवस्थानतर्फे आहेर दिला. मराठी दिंडी पंजाबात आणणारे पहिले वारकरी म्हणून त्यांनी ज्ञानेश्वर माऊलीस मानपत्र देऊन सत्कार केला.

ग्राम प्रदक्षिणेच्यावेळी दिंडीत हजारो लोक सामील झाले. प्रदक्षिणा संपल्यावर आम्ही मोटारीत बसलो आणि घुमान सोडले. त्यावेळी निरोप देण्यासाठी जमलेल्या हजारो लोकांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. गाडी सुटण्याच्या ऐनवेळी तेथील महिलांचे हुंदके उत्कटतेनें जाणवू लागले. त्याचवेळी आम्हा सर्वांचे अंतःकरण हेलावले. घुमानच्या लोकांची भाषा पंजाबी, तेथील वास्तव्य चारपाच दिवसांचे, त्यात आम्ही शब्दाने बोलत नव्हतो, मने आणि अंतःकरणे नामदेवरायाच्या सूत्रात गोवून नाच कीर्तनाच्या रंगी 'ज्ञानदीप लावू जगी' ही नामदेवरायाची ओळ म्हणत तिचा ठसा मनावर उठवीत पुढे जात होतो.

० ० ०

: ६ :

हृषिकेश येथे जावे त्या ठिकाणी देऊळ दिसते

रवन्ना या गावी रात्रीं थोडा मुक्काम होता. रस्त्यावर गाडीवाला उभा होता. त्याच्याकडे पाणी–पुरी घेतली. पहाटे पाचला हरीद्वार येथे आलो. गंगामाता हिमालयाचे कडेकपारी ओलांडीत पठारावर प्रत्यक्ष जिथे उतरते, ते हे हरिद्वार. तेथून लक्ष्मण झुला ओलांडून हृषिकेश गाठले. मंदिराचे हे गाव नव्हे क्षेत्र असे हृषिकेशचे स्वरूप आहे. दुकाने वगळली की जेथे जावे तिथे देवळे असे हिमालयाच्या कुशीत बसलेले हृषिकेश. हरिद्वारपासून चौदा मैलावर. चारीधामाच्या यात्रेचा प्रारंभ येथूनच. काळीकमळीवाला बाबांचे कार्याचे हे प्रधान केंद्र आहे. हिमालयाच्या यात्रेतील अति कष्ट त्यांनी अनुभवले. असे कष्ट पुढच्या यात्रेकरूंना जाणवू नयेत, म्हणून चारीधामाच्या मार्गावर त्यांनी जागोजागी धर्मशाळा बांधल्या. इतकेच नव्हे तर, शिधापाण्याची, अंथरूण–पांघरूणाचीहि सोय केली. हे कर्मयोगी स्वामी विशुद्धानंद, त्यांनी १८९७ मध्ये समाधि घेतली. हृषिकेशमध्ये ८५ धर्मशाळा, ५७ सदावर्ते, ५० पाणपोया आहेत. औषध–उपचाराची

१० केंद्रे आहेत. अशा संस्था तेथील स्वर्गाश्रम या संस्थेतर्फे चालतात. गीता भवनात गीता आणि तुलसी रामायण यांच्या कथा चित्रित केल्या आहेत.

विठ्ठलाश्रम ही संस्था वसंतराव चिटणीस या मराठी साधकांनी सुरू केली आहे. लक्ष्मण झुल्यावरून गंगा नदीपार झाल्यावर तेथे निरनिराळी लहान मोठीं मंदिरे आढळतात.

व्रज घाटावर साऱ्याच धर्मशाळा:

यानंतरच्या कार्यक्रमात हरिद्वार, तेथे गंगा स्नान करताना पाण्याला ओढ फार, म्हणून घाटाला बांधलेल्या साखळचा धरून आंधोळ करावी लागते. हरिद्वारला तेथील रामघाटावरील राधाकृष्ण मंदिरात आमचे जेवण झाले. पुण्याचे महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार यांच्यापैकी रामकृष्ण गणपत पोतदार यांनी तेथे आमची सोय केली.

गयेच्या वाटेवर शहाबाद जिल्ह्यातील सासाराम गाव लागले. आमच्या गाड्या हृषिकेश, मुझफरनगर, मिरत, हसनपूर करीत गडमुक्तेश्वरच्या व्रज घाटावर आम्ही गंगेत स्नान केले. व्रज घाटावर एकहि घर नाही. ३०–४० धर्मशाळा, वेदांत मंदिर, असे हे नवे धर्मक्षेत्र लोकांची ये – जा वाढल्याने गेल्या ५० वर्षात निर्माण झाल्याचे तेथील वेदांत मंदिरांतील श्री सद्‌गुरु महाराज महात्मा श्री बुलाकेरामजी यांनी सांगितले. निवांतपणानें जपजाप्य, ध्यान, निरूपण, प्रवचन अशा उपक्रमाला हा नवा व्रज घाट नवे स्थान आहे. तेथून लखनौ मुरादाबादच्या वाटेवर, जोया, बुढाणपूर, पाटवडा (या ठिकाणी उंटाच्या गाड्या लोक चालविताना आढळले.) मुरादाबाद भागातील मोठ्या रस्त्यावर किर्लोस्कर इंजिनचा बोर्ड बघितला. बरेली भागात

हत्ती दिसले. तेथून शहाजानपूरला पेट्रोल पंपापुढील पटांगणात रात्री सर्वांनी मुक्काम केला.


धार्मिक कलह प्रथम येथे भेटला :

पुढे लखनौ, बाराबंकी, फैझाबाद येथून अयोध्या गाठली. फैझाबाद गावीं जनरल करिअप्पा यांचे नाव एका रस्त्याला दिले होते. येथून श्रीरामाचे स्थान–अयोध्या गाठली. रामजन्माची जागा आणि मशीद यातून तंटा निर्माण होऊन कोर्ट – कचेरीं चालल्याचे तेथील पोलीस बंदोबस्तावरून समजले. खिडकीतून ४० फूट अंतरावरून रामजन्माच्या जागेचे दर्शन घ्यावे लागले. राम राज्याभिषेकाची जागा, उंच टेकडीवरील हनुमानाचे मंदिर हे अयोध्येचे आकर्षण आहे.

तेथून निघून अलाहाबादला यायला रात्री दोन वाजले. नदीच्या वाटेवर गांवाबाहेर थोडी झाडीं होती. त्या झाडाखाली रात्री मुक्काम केला. अलाहाबाद गाठले तेव्हा मोटारीने पांच–सहाशे किलोमीटर किंवा २८०० मैल प्रवास केल्याचे आढळले.

त्रिवेणी संगमात स्नान :

या तीर्थयात्रेत केवळ तीर्थक्षेत्रेच गाठावयाचीं असे योजलेले होते. इतर गावे पहात राहिलो असतो तर एक महिन्याच्या मुदतीत उत्तरेकडील सारीं क्षेत्रे झाली नसती, हे धोरण पुढे असल्यामुळे आम्ही आकर्षण असूनहि सुरत वगळले. अहमदाबादेत प्रवेश केला नाही. प्रत्यक्ष प्रयागला जाऊनहि तेथे त्रिवेणी संगमात स्नान आणि धर्मकार्य करून अलाहाबादला न जाता पुढे निघालो.



हरिद्वारपासून चौदा मैलांवरील हिमालयाच्या कुशीत वसलेला हृषिकेशचा गंगाकिनारा व तेथील प्रसिद्ध मंदिरे. हिमालयातील यात्रांचा प्रारंभ येथूनच होतो.

गाड्या बिहारकडे वळल्या :


गोपीगंज, वाराणशी पुढे श्री क्षेत्र काशी गाठले. काशीला गंगास्नान, विश्वेश्वर दर्शन संपवून आमच्या गाड्या बिहार राज्याकडे वळल्या. महाराष्ट्र सोडल्यापासून वाटेत कोठे केळी दिसत नव्हती. बिहारमधील पहिले गाव सासाराम, तेथे केळींच्या बागा प्रथमच आढळल्या. शाहाबाद जिल्ह्याचे सासाराम हे प्रमुख ठिकाण. तेथे शेरशहाची कबर आहे. सासारामहून जाताना सोण नदीचे मोठेपात्र येथे अडीच–तीन मैल लांबींचा लांबलचक पूल आहे. पुलाखाली नदीत वाळवंट, अशा या मोठ्या पुलावरून पुढे गेल्यावर वाटेत औरंगाबाद, शिवगंज (ही गावे बिहारमधील) लागली. पुढे बुद्धगयेचे क्षेत्र गया, लागले. गया ते जगन्नाथपुरी या वाटेला लागलो. गया ते पुरी हा मोठा टप्पा पार पाडण्याचे इराद्याने गाड्या चालू लागल्या. वाटेत गांधीजींनी राजेंद्रबाबूंना पहिले सत्याग्रही म्हणून पाठविले होते ते चंपारण्य गाव लागले.

विष्णूपाद दर्शन :

गया क्षेत्रात फलगु नदी आहे. पण ती पूर्ण कोरडी आहे. या ठिकाणी भगवान विष्णूचे शिळेवर उमटलेले एक पाऊल तेच हे विष्णूपाद. त्याचे दर्शन घ्यावयाचे असते. गयेला गेल्यावर तेथे पितृतर्पण, पिंडदान करावे, असे या क्षेत्राचे महात्म्य. आपले शरीर पवित्र व्हावे अशी प्रार्थना गयासुराने विष्णूपाशी केली होती. त्याचे शरीर पवित्र झाले. त्याच्या या पवित्र शरीरावर ब्रह्मदेवांनी यज्ञ सुरू केला. गयासुर उठू लागला तेव्हा धर्मराजानी त्याच्या छातीवर शिला ठेवली तरी गयासुर उठू लागला. तेव्हा विष्णूने शिलेवर पाय ठेवले ते हे विष्णूपद. शिलेवर पावलाची आकृति तेथे आजहि दिसते.



ज्या ठिकाणी भगवान बुद्धांनी तपश्चर्येने मुक्ति मिळविली
त्या बुद्धगया येथील त्यांचे भव्य प्राचीन मंदिर



दशरथाला पिंडदान दिल्याचे पाहिले असून . . . . . फलगू नदी आणि पंडे दोघेही साक्ष देईनात म्हणून सितामाईने त्यांना शाप दिला व तेव्हापासून फलगू कोरडी पडली, पंड्यांचे दारिद्रयहि संपत नाही.

नदी कोरडी, पंड्ये भिकारी :

अशी एक आख्यायिका आहे, की प्रभुराम पिंडदानासाठी येथे आले होते नदीपासून ते थोडे दूर गेले तोच पिंड स्वीकारण्यासाठी राजा दशरथाचे हात पुढे आले. सीतामाईने ते पाहून वाळूचे पिंड त्या हातावर ठेवले व हात गुप्त झाले. थोडया वेळाने राम प्रभू आले व पिंड दानासाठी संकल्प केला तरी पिताजी दशरथांचे हात पुढे येईनात तेव्हा सीतेने पिताजीचे हातावर वाळूचे पिंड दिल्याची हकिगत सांगितली आणि खात्री पटविण्यासाठी (फलगू नदी पंडे)

यांची साक्ष काढली. दोघेहि बोलेनात तेव्हा सीतेने शाप दिला त्यावेळे-पासून फलगू नदी कोरडी पडते आणि पंड्यांचे दारिद्र्य काही संपत नाही, अशी आख्यायिका आहे.

बुद्धाची सुवर्ण मूर्ती :



गयेला जाताना बुद्ध गया लागते. तेथे श्री भगवान बुद्धाची १५ फुट उंचीची सोनेरी मूर्ति एका भव्य सभागृहात स्थापन केलेली आहे. थायलंडच्या राजाने ही मूर्ति दिली. अमेरिकन विमानाने येथे आणली. आणि ३ मे १९६७ ला या भव्य मंदिरात स्थापना केली. जवळच महात्मा बुद्धांचे प्राचीन मंदिर आहे. त्याची उंचीं १०८ फूट. भव्य मंदिराला लागून एक मोठा वृक्ष आहे. तोच बोधिवृक्ष होय.

या विशाल वृक्षाच्या शीतल छायेत भगवान बुद्धांनी ३६ दिवस निराहार-पूर्वक तपश्चर्या केली. आणि मुक्ति मिळविली. ते स्थान आणि भगवान बुद्धाच्या वास्तव्याने पावन झालेला हा परिसर. येथे प्रसन्न वातावरण आहे. जपानी तिबेटी भिक्षुक या भागात वावरताना दिसले.

खांब प्रदक्षिणेने पापमुक्त व्हा :

या परिसरातील एका बुद्धमंदिरात एक मोठा खांब आहे. त्याची रुंदी १५ फूट आणि उंची ४०-५० फूट असावी. खांब फिरता असून त्याला धरून दोन वेळा प्रदक्षिणा करा आणि पापमुक्त व्हा, असा बोर्ड तेथे आहे. भगवान बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याच्या देहास अग्निसंस्कार करण्यात आला आणि त्यांच्या अस्थि देशातील आठ स्थानांवर स्थापित करून तेथे आठ स्तूप बांधण्यात आले. जेथे अस्थि होत्या. तेथे एक स्तूप आणि रक्षा ठेवली तेथे दहा स्तूप असे हे भगवान बुद्धाचे स्मारक होय.

० ० ०

: ७ :

' या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी '

या यात्रेतील एक वैशिष्टयपूर्ण माहिती लिहिल्यावाचून रहावत नाही. अयोध्येकडे जाताना बरेली गाव ओलांडून शहाजहानपूरला रात्री दहा वाजता एका पेट्रोल पंपाजवळ मोकळ्या जागेत आमचा मुक्काम होता. पंपाच्या दोन्ही बाजूला दोन झोपड्या होत्या. तेथे हॉटेल्स चालू होतीं. या दोन्ही हॉटेलांत टेबल नव्हते, खुर्ची नव्हती, झोपडीपुढच्या प्रशस्त पटांगणात २५–३० बाजली टाकलेली होती. मोटार, ट्रकवाले तेथे येत, पंपावर पेट्रोल घेऊन गाड्या बाजूला सोडीत आणि बाजल्यावर आडवे होऊन विश्रांति घेत. हॉटेलवाला त्यांना बाजल्यावर जेवण आणून देई जेवण करून एक डुलकी घेऊन मोटारवाले ताजे तवाने झाल्यावर तेथून निघत.

जवळच्या विहीरीतील पाणी काढून तोंड धुतले. आणि या हॉटेलात दूध घेतले. हॉटेलमालक ७२ वर्षाचा. जंगबहादूरसिंग, त्याचे नांव. तो म्हणाला, रोज दुकान रात्री ९ ला उघडतो व पहाटे

चारला बंद करतो. रिक्षावाले. जाणारे–येणारे यांना गरम पोळी तयार करून आपण पोळी–भाजी देतो, ३५ वर्ष असा याचा धंदा चाललाय. पोळी–भाजी, चहा–दूध देण्याचीही सोय किती उपयोगी ठरली, हे सांगताना हॉटेलवाला म्हणाला, केवळ या हॉटेलची सोय आहे म्हणून रिक्षावाल्यांनी आपला अड्डा केला आहे त्यांची दोन मुले मिळवती आहेत, 'या निशा सर्व भूतानां तस्यां जागति संयमी' या न्यायाने हा जंगबहादूर रात्री हॉटेल चालवितो व दिवसा झोप घेतो. बाजली घालून मोटारवाल्यांची सोय केल्यामुळे या हॉटेलवाल्यांना भरपूर गिऱ्हाईक मिळत असे. अशा या ठिकाणी आम्ही रात्री मुक्काम केल्यामुळे हे दृष्य पहाता आले.

देव ठेवील तेवढा आपला पैसा :

आमच्या या प्रवासात वारकरी कसे वागत होते तो एक नमुना उद्‌बोधक वाटेल. नदीवर स्नान करून प्रत्येक वारकरी कपाळावर गंध लावी, त्यानंतर गीता पठण, अभंगवाणी ही पोथी करून आपले सद्‌गुरु देहूकर महाराज यांच्या चरणावर मस्तक ठेवीत आणि मग त्यांचा नित्यक्रम चालू राही. दोनतीन ठिकाणी सर्वांच्या जेवणाचा योग एकत्र आला तेव्हा त्यांनी सर्वांनी मिळून गीतेचा १५ वा अध्याय म्हटला. ही माणसे खेडचातून आलेली, सामान्यतः शेतकरीवर्गातली. पण गीतेचा १५ वा अध्याय त्यांना सुखोद्‌गत होता, याचा मला अचंबा वाटला. मानवी स्वभावाचा एक एक नमुना या यात्रेत वेळोवेळी जाणवत होता. उस्मानाबाद जिल्हयातील एक खेडूत महिला आमच्या मोटारींत होती. मथुरेला यमुना नदीत आम्ही स्नान करून देवदर्शनाच्या तयारीत होतो, तेव्हा ती बाई मला म्हणाली, " काकाजी, देव ठेवील तेवढा आपला पैसा, बाकीचा देवाचाच नाही का ? "

मला या म्हणण्याचा अर्थबोध झाला नाही. तेव्हा ती म्हणाली, " यात्रेत अडीअडचणीला लागेल, म्हणून आणलेल्या नोटापैकी शंभराच्या तीन नोटा भिजून गेल्या, बाकी कोऱ्या करकरीत नोटा नीट सांभाळण्यासाठी त्या बाईनी सायकलची टयूब आणली होती आणि तीत नोटा ठेवून ती कंबरेला करदोटयाप्रमाणे बांधली होती.


स्नान करून कपडे बदलले तरी कंबरेला बांधलेली टयूब तशीच राही, त्यामुळे तीमधील पैसे सुरक्षित राहात व चोरीची भीति नसे. पण ही टयूब कोठे चिरली नि मधल्या तीन नोटा भिजल्या. त्या नोटा देवाच्या, त्याचा नैवेद्य घाला असे सांगून तीनशे रुपये तिने महाराजांना दिले आणि त्यातून नैवेद्य झाला.

नक्षलवाद्यांचा प्रताप :

गयेहून जगन्नाथपुरीकडे जाताना वाटेत एका पेट्रोल पंपाजवळ आमचा मुक्काम होता. तेथील व्यवस्थापक त्या भागातील माहिती सांगत होता. या रस्त्यावरून कलकत्याकडे जाताना एक मोटार अपघाताने मोडली. ड्रायव्हर सुखरूप होता. त्याने तार करून मोटारमालकाला बोलावून घेतले. मदतीसाठीं १० हजार रुपये घेऊन मालक आला होता, पण पैसे काढून घेऊन नक्षलवाद्यांनी मालकाचा खून केला. यामुळे या जंगली भागातून रात्रीच्या वेळी रस्ता धोक्याचा म्हणून आम्ही तो प्रवास टाळत होतो.

जमशेटपूरलगतचा रस्ता ५० फूट रुंदीचा, उत्तम डांबरी, पण ५०–६० मैलावरसुद्धा एक गाव नाही. अशा या निर्मनुष्य रस्त्यावरून जाताना भीती वाटत होती. जगन्नाथपुरीच्या भागात बैलाची जात खुजी

कंबरेएवढे लहान बैल गाडीला जुंपत आणि त्याच्या शिंगाला दोरी बांधून ती जूला अडकवित. बैलाला वेसण नाही आणि मालकाच्या हातात लगाम नाही, असा येथे प्रकार आहे.



ओरिसातील पुरी येथील जगन्नाथाचे भव्य मंदिर

जगन्नाथपुरी येथील भव्य मंदिर :

जगन्नाथपुरीपासून ७ मैल अलीकडे साक्षी गोपाळ स्थान आहे. जगन्नाथदर्शन केल्याची साक्ष म्हणून या साक्षी गोपाळाचे दर्शन घेतात. येथील पंडे दर्शनास येणाऱ्याचे नांव लिहून घेऊन त्याला प्रसाद देतात.

जगन्नाथजींचा प्रसाद हा कसदार, सुमधुर असा आल्हाददायक असतो. या प्रसादामधील पोषक द्रव्येहि फार वरच्या दर्जाची असतात.

जगन्नाथपुरीला पोहोचलो. बलराम, सुभद्रा आणि श्रीकृष्ण यांचे मोठे मंदिर आहे. आतील मंदिराचा घेर ६६६ फूट आहे. प्रवेशद्वारात दोन दगडी सिंह उभे आहेत. तेथे चौतीस फूट उंचीचा दगडी स्तंभ उभा केला आहे. राजा आनंदा भीमदेव यांनी हे मंदिर बांधले, अशी कथा आहे. ११६६ मध्ये हे जगन्नाथ मंदिर झाल्याची नोंद आहे. मंदिरावरील दगडीं कोरीव कामात स्त्री-पुरुषांची अनेक चित्रें कोरलेली आहेत. जगन्नाथजी यांच्या नौकाविहारासाठी जवळच चंदन तलाव आहे. या तलावात विद्युत् रोषणाईने सजविलेल्या नावेतून रात्री जगन्नाथजींचा नौकाविहार होतो. उत्तरेकडील हा नौकाविहार आणि दक्षिणेतील उडपी येथे मध्वसरोवरात होणारा नौकाविहार यात अगदी साम्य आहे. दोन्ही तलावाच्या मध्यावर चौथरा, दोन्ही तलावांच्या भोवती पायऱ्या आणि नौकाविहार करणारे तिकडे दक्षिणेत प्रत्यक्ष श्रीकृष्ण आणि उत्तरेस जगन्नाथ हे नाव धारण केलेले श्रीकृष्ण हे साम्य उत्कटपणे जाणवते. जगन्नाथ मंदिरातील तीनही मूर्ति बलराम, सुभद्रा आणि श्रीकृष्ण यांच्या आहेत.

ओंडक्याच्या मूर्ति :


मूर्ति पाषाणाच्या नाहीत, समुद्रातून वाहून आलेले झाडांच्या बुंध्यांचे ओंडके येथे मूर्ति म्हणून बसवितात. त्यांनाच पेहराव करून डोळे, तोंड, नाक वगैरे चित्रित केले जातात. सबंध हिंदुस्तानात सुभद्रेचे हे एकमेव मंदिर आहे. देवालयातील मूर्ति म्हणजे तीन लाकडी ओंडकेच. दर बारा-पंधरा वर्षांनी मंदिरात पूजा होत असलेल्या या वस्तू बदलल्या जातात.



जगन्नाथ मंदिरातील बलराम, सुभद्रा व श्रीकृष्ण यांच्या मूर्ति. या पाषाणाच्या नाहीत. समुद्रातून वाहून आलेले झाडांच्या बुध्यांचे ओंडके मूर्ति म्हणून बसवितात व त्यांना पेहराव करून नाक, डोळे वगैरे चित्रित करतात.

दोन अनुभव :

वाटेत आमच्या गाड्या थांबल्या. सर्वजणांना तहान लागली होती. पण एक फकीर तेथे नळाखाली आंघोळ करीत होता. जवळचे दोन दुकानदार तेथे आले. तहानेलेले लोक उभे असताना अशी चावी अडकवून धरणे बरे नव्हे, असे त्यांनी त्याला सुचविले आणि मग आम्हाला पाणी पिता आले. असाच दुसरा अनुभव भुवनेश्वरीला आला. गाड्या थोड्या दूरवर सोडल्या होत्या. देवदर्शनाला आम्ही जावयाचे म्हणून पादत्राणे गाडीत ठेवून आम्ही अनवाणी चाललो होतो. वर कडक उन्ह आणि



दिंडी पंढरपूर येथे परत आली. चंद्रभागा वाळवंटातील समाधी मंदिरापाशी घेतलेला फोटो.

खाली तापलेली डांबरी सडक असा भाग थोडा होता. पण त्यातून निभावून आम्ही मंदिर गाठले. आत जाऊन भुवनेश्वराचे दर्शन घेतले. मंदिरात सर्वत्र पाणी सांडल्याने तापलेल्या पायांना गार वाटू लागले आणि देवदर्शन घेऊन या मंदिराभोवती प्रदक्षिणा घालताना वर पुन्हा उन्हे व खाली तापलेले दगड यामुळे हैराण होण्याच्या अवस्थेत असताना प्रदक्षिणेच्या वाटेत एक हौद लागला. पुजारी त्यातील पाणी ओढीत होता. पिण्याला थोडे पाणी मागितले तर त्याने साफ नकार दिला.

यावेळी नळाचे पाणी अडवून ठेवणाऱ्या सासारामच्या त्या फकिराची आठवण झाली. नळ अडवून ठेवणारा फकीर आणि पाणी न देणारा पुजारी दोघेही सारखेच, असे माझ्या मनात येऊन गेले.

पुरीहून परत फिरलो :

जगन्नाथपुरीहून दुसऱ्या दिवशी संबळपूर महानदी ओलांडून बारघाट (ओरिसा) येथे शामसुंदर राईस मिलमध्ये आम्हाला आसरा मिळाला. गिरणी नव्याने सुरू झालेली. रोज बावीस तास मशीन चालते. तेथून ओरिसा प्रांत संपला आणि मध्यप्रदेश सुरू झाला. रात्री साडेदहाला रायपूर जिल्हयातील आरग गाव लागले. बाराला रायपूरला आलो आणि पहाटे पाचला महाराष्ट्राच्या भंडारा जिल्हयातील सांगोली जंगलात प्रवेश केला. पुढे दुपारी बारा वाजता नागपूर करून गुरुकुंज, अमरावती आणि वाशीमार्गे परभरगी, औंढ्या नागनाथ, संत नामदेव व सद्गुरु विठोबा खेचर यांच्या भेटीचे स्मरण करून परळी–वैजनाथ या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन रात्री साडेनऊ वाजता पंढरपूर गाठले. चैत्र एकादशीला जेथे आरती केली होती त्याच चंद्रभागेच्या वाळवंटात वैशाख एकादशीला आरती केली व यात्रा संपली.

पाच हजार मैलांची यात्रा :

या यात्रेत आठ हजार पाचशेतीस कि. मी. मोटारचा प्रवास झाला. महाराष्ट्र, गुजरात, राजस्तान, मध्यप्रदेश, हरियाना, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा या प्रांतांतून प्रवास झाला. मराठी, डांगी, गुजराती, पंजाबी, राजस्थानी, हिंदी व ओडिया अशा बहुभाषिक लोकांशी कमी–अधिक संबंध आले. इकडे खंबायतच्या आखातात, अरबी समुद्रात, तिकडे जगन्नाथपुरीला बंगालच्या उपसागरात, खाली गोदावरी नदीत, वर हरिद्वारला गंगेत स्नान केले या टापूतील बहुतेक सारी धर्मक्षेत्रे पाहिलीं, शक्य तेथे स्नान, पूजा, भजनादि पुण्यकर्म करण्याची संधि साधली. प्रमुख तीर्थावर दिंडीने जाऊन दर्शन घेण्याचा उपक्रम केला.

सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगी कथा :

वारकरी संप्रदायाच्या परंपरेत एवढी मोठी दिंडी घेऊन नामदेव जन्मशताब्दीनिमित्त तीर्थयात्रा करणारे ज्ञानेश्वर माऊली देहूकर हे पहिलेच फडकरी होत. त्यांनी पंजाबला दिंडी नेली म्हणून नामदेव दरबार कमिटीनें देहूकर महाराज यांना मानपत्र दिले. महाराष्ट्राच्या वारकरी समाजाचा पंजाबात झालेला हा गौरव अभूतपूर्व असाच आहे. ही नामसंकीर्तन यात्रा यशस्वी झाली याचे सर्व श्रेय ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांनाच आहे. चाळीशीसुद्धा न ओलांडलेल्या या तरूण नामदेवभक्तानें केलेली ही कामगिरी वारकरी समाजाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगी आहे, हे खास.

समाप्त

वाचकांची पत्रे

भारतीयांच्या श्रद्धाशील संस्कृतीचे भव्य दर्शन

रा. रा. बागलकोटे यांना ज्या वातावरणात ही यात्रा घडली त्या अपूर्व योगाचा अनुभव शब्दांकित करताना त्यांच्या रसाळ भाषाशैलीची ओववती सरीता इतकीं भक्तिमय होते कीं त्यांत अवगाहन करून वाचक तृप्त होतात. संतश्रेष्ठांच्या एका आगळ्याच विश्वांत नेऊन सोडताना लेखकाने आधिभौतिक अनुसंधान ठेऊन कांही स्थळांची दिलेली ऐतिहासिक, भौगोलिक व प्रागतिक माहितीं चित्तवेधक होते. भारतीयांच्या श्रद्धाशील संस्कृतिचे भव्य दर्शन शांति आणि समाधान देणारे आहे.

राजकुमारी मंगलाराजे
ऑफ मिरज सी.

समाज व राष्ट्रात आवश्यक पाठ

मी दिल्ली, हरद्वार, हृषिकेश, आग्रा, प्रयाग, काशी वगैरे करून आलो आहे. त्यामुळे देशाची दुसरी बाजू लेख वाचताना नुसताच पुनःप्रत्ययाचा आनंद लाभला असे नाही, तर एक नवीन दृष्टी मिळाली. प्रांतोप्रांतात, भाषिकाभाषिकांत आज जे वातावरण आहे ते निवळण्याला 'नामदेव' या एका अधिष्ठानामुळे जीवाभावाचे मैत्रीचे वर्णन पंढरपूर व पंजाबसारख्या दोन टोकास जे दिसले त्याचा निश्चित उपयोग होईल, समाज व राष्ट्र यांना आवश्यक ते पाठ देण्याचे कार्य असेच वृद्धिगत होवो, ही परमेश्वरचरणी प्रार्थना !

डॉ. ह. पां. पटवर्धन, मिरज.

☆

महाराष्ट्रातील संत शिरोमणी श्री. देहूकर महाराज यांनी अडीचशे महाराष्ट्रीय भाविकाना भारतीय तीर्थांचे दर्शन घडविले. ती वर्णने आपण सकाळमधून सात लेखांकामधून प्रसिद्ध केली आणि ते अंक विनामूल्य प्रत्येक दिंडीयात्रेकरूस पाठविले या उपक्रमाबद्दल आम्हीं आपले आभारी व ऋणी आहोत.

दिंडीतील वारकरी
(जेऊर), सोलापूर.

☆

आपली 'देशाची दुसरी बाजू' यात्रावर्णन वाचून आम्हीही चंद्रभागेच्या वाळवंटात आरतीनें सुरुवात केली आणि आरतीनेंच यात्रा संपविली. त्याप्रमाणेच वाचूनही प्रदक्षिणा झाल्याचे समाधान लाभले. आपणांस धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहे. आपल्या हातून अशीच सेवा घडावी, अशी पांडुरंग चरणी प्रार्थना.

जोशी, विश्रामबाग

सद्यःस्थितीत सर्वांना मार्गदर्शक

'सकाळ' मधून 'देशाची दुसरी बाजू' ही लेखमाला मी वाचीत आलो. खरोखरच सद्यःस्थितीत ती सर्वांना मार्गदर्शक व माहितीपूर्ण अशीच आहे. संतांबद्दल आदरभावना काय असते ती उत्तर हिंदुस्तानात दृढतरपणे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे ठिकठिकाणची उद्बोधक माहिती मिळते. श्री. बागलकोटे यांनी या यात्रेच्या निमित्ताने ही अभ्यासपूर्ण लेखमाला सकाळमार्फत प्रसिद्ध केली; त्याबद्दल त्यांना व श्री. नानासाहेब परुळेकरांना धन्यवाद. आपल्या देशात संतांनी केलेले कार्य शाश्वत व अवर्णनीय आहे, आणि सध्याच्या काळात ते जनतेसमोर येत राहिल्यास एकात्मतेस पोषक ठरणार आहे.

वि. अ. कुलकर्णी, किर्लोस्करवाडी

☆

मी पंजाबात बरेच दिवस होतो, पण घुमान येथे जाऊ शकलो नाही. आपण जे वृत्त प्रसृत केले आहे, ते वाचले. प्रत्यक्ष जाता आले नाही, तरी वाचूनदेखील खूप समाधान वाटले.

पाच हजार मैलांच्या दिंडीचे लेखक आपण असाल अशी कल्पना नव्हती. आपली रसग्रहणवृत्ती, लेखनशैली व भक्ती हे सर्व वाचून आपल्याबद्दलचा आदर द्विगुणित झाला. आपण भक्तिमार्गी संप्रदायातले आहात हे माहीत नव्हते. ते समजले. एवढ्या मोठ्या दिंडीबरोबर आपणांस जायला मिळाले, याचा मिरजकरांना अभिमान वाटावा असे आहे. शतशः धन्यवाद.

दामोदर गोरे, पुणे

'सकाळ' मध्ये क्रमशः सात लेखात ५,००० मैलांचा प्रवास, 'देशाची दुसरी बाजू' अत्यंत उत्तम प्रकारे लिहून दिंडीत नसलेल्यांना, ते वाचून आपल्या दिंडीत असल्याचा भास झाला. सर्व लेख वाचून अत्यंत समाधान वाटले. त्याबद्दल आभार.

मृगेंद्र व्ही. महाजन, अष्टा

☆

'देशाची दुसरी बाजू' ही लेखमाला प्रसिद्ध केल्याबद्दल डॉ. नानासाहेब परुळेकर यांना धन्यवाद. नामदेव दरबार कमिटीने देहूकर महाराजांचा सत्कार केला आणि तेथील ८७ वर्षांच्या वृद्ध महंताने देहूकर महाराजांचे पाय धुतले, बायकोने पायावर फुले वाहिली, हे वाचून अंतःकरण हेलावून जाते. लेखकांनी केलेले तंतोतंत प्रवास–वर्णन वाचून प्रत्यक्ष दिंडीत सहभागी झाल्याचा आनंद मिळाला. लेख एकदा वाचले की पुन्हा वाचावेसे वाटतात.

माधव चव्हाण, कोल्हापूर

श्री तुकाराममहाराजांच्या पश्चात श्री देहूकरमहाराज यांची फडपरंपरा

देहूकर महाराजांचे घराणे दोनशे वर्षांपूर्वी श्री क्षेत्र पंढरपूर येथे आले. सांप्रत देहूकर फडाचे मालक श्री. ह. भ. प. सोपानकाका देहूकर हे श्री तुकोबारायांचे वंशज असून त्यांचे वडील मुलांच्या घराण्यातील आहेत. इनामवतनासंबंधी भाऊपणामध्ये वाद निर्माण झाला असता श्री तुकाराम महाराजांपासूनचे तिसरे पुरुष महादेव महाराज हे पंढरीस १६८४ त आल्याचा उल्लेख सापडतो. श्री ज्ञानेश्वर माऊली देहूकर यांचे हेच ते पंढरीस आलेले पूर्वज होत. तेव्हापासून देहूकरांचे घराणे पंढरपूर येथेच आहे.

भागवतधर्माचा प्रसार, वारकरी संप्रदायाची परंपरा, पंढरीची वारी हे कार्य देहूकरांच्या घराण्यात पिढ्यान पिढ्या अव्याहतपणे चालत आले आहे. देहूहून आलेले महादेव महाराज यांचे चिरंजीव श्री वासुदेव महाराज देहूकर यांनी वारकरी संप्रदाय पंढरीच्या क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढविला आणि त्याला व्यापक स्वरूप दिले. तसेच वारकरी समाजामध्ये अनेक थोर विभूती निर्माण करून त्यांना भागवत धर्म व वारकरी संप्रदाय यांची वाढ करण्यास सांगितले.

पंढरपूरला आषाढी–कार्तिकीच्या मोठ्या वाऱ्या भरतात. वारीच्या वेळीं फड भडविण्याची प्रथा श्री वासुदेव महाराज यांनी घालून

दिली. फडावर येणारा वारकरी भाविक समाज महाराष्ट्राच्या सर्व भागातून येतो. कर्नाटक, गुजरात येथूनही येणारा समाज आहे. महाराष्ट्रातील संतांची जी ठिकाणे आहेत, त्या त्या ठिकाणी पंढरीहून देहूकरांची दिंडी प्रतिवर्षी जात असते. अरण, पैठण, त्र्यंबकेश्वर, आळंदी, गोरखनाथ आदी ठिकाणी यात्रांच्या वेळी देहूकरांचा फड भरतो आणि तेथील काहीं ठराविक कार्यक्रम देहूकरांच्या हस्ते पार पडले जातात, अशी पूर्वीपासून प्रथा चालत आली आहे. श्री भाऊसाहेब महाराज देहूकर हेही फार मोठे साधुपुरुष होऊन गेले. यांनाच श्री पांडुरंगाने त्यांच्या निर्वाण–समयी येऊन पाणी पाजले, ही गोष्ट सर्वविख्यात. भाऊसाहेब देहूकरांची समाधी पंढरीस चंद्रभागेच्या वाळवंटात आहे. त्यांच्यासमोरच देहूकरांचा फड भरत असतो. त्याचप्रमाणे श्री वासुदेव महाराज देहूकर यांचा प्रति–वर्षी भाद्रपद शुद्ध १३ ते अश्विन शुद्ध १० दसऱ्यापर्यंत एक महिना उत्सव असतो. रोज अन्नदान, भजन–कीर्तनादी कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणात होतात. हा उत्सव आणि फडाचे सारे नेमधर्म श्री निवृत्तिनाथ मंदिरामध्ये प्रतिवर्षी होतात. फडावरील समाजाच्या सहकार्यानेच निवृत्तिनाथमंदिराची उभारणी झाली आहे.

प्रस्तुत कालातच श्री सोपानकाका यांचे चिरंजीव ज्ञानेश्वर माऊली देहूकर हे आपल्या फडाची परंपरा चालवितात. त्याचप्रमाणे त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मोठे नामसप्ताह साजरे केले आहेत आणि वारकरी सांप्रदायाच्या दृष्टीने त्यांनी फार मोलाचे कार्य केले आहे.
